# श्रीहरिविज

ुकर रानडे

म. ग्रं. सं. ठाणे
विषय बा. वा.
वा. क्र. 9...552



IRBK-0116553
IRBK-0116553

# गोष्टीरूप श्रीहरिविजय

[भरपूर चित्रांसह] लेखक— मधुकर सानडे

## १. वसुदेव देवकीचें लग्न

परमेश्वराचा राम अवतार संपल्यावर पृथ्वीवर पुन्हां महा- भयंकर असे दैत्य माजून ते सर्वांना अतिशय त्रास देऊं लागले. तसेच कंस, मुष्टिक, चाणूर, अघबक, केशी, शिशुपाल, प्रलंब, वक्रदंत, चैद्य व जरासंध वगैरे अतिशय पराक्रमी व प्रबळ होऊन मनमानेल तसा प्रजेचा छळ करूं लागले. जरासंधानें तर कमालच केली. त्यानें बावीस हजार राजे स्वतःच्या बंदिशाळेंत डांबून ठेवले. भोमासुरहि त्याच्याचप्रमाणें होता. त्यानें चौदाहि भुव- नांतल्या प्रजेचा व लोकांचा अनन्वित छळ सुरू केला. याच्यापुढें जाऊन कालयवन आणि बाणासुर यांनीं पापकर्माला कांहीं मर्या- दाच ठेवली नाहीं. तिकडे कौरव क्रूर प्रकारें वागून ते घमेंडींत नीति व धर्म सोडून वागूं लागले. सर्व वाईट गोष्टी पृथ्वीवर घडूं लागल्या. या सर्व पापकर्मांच्या भारानें पृथ्वीनें शेवटीं गाईचें रूप धारण केलें व तिनें आक्रोश सुरू केला, 'बुडालें बुडालें' असा.

त्याचप्रमाणें ही सर्व स्थिति जाणून थोरामोठ्या ऋषींनीं या सर्व गोष्टी ब्रह्मदेवाच्या कानांवर घातल्या. तिकडे इंद्रालाहि या गोष्टी असह्य वाटून तो सर्व देवांसह स्वतःचें गाऱ्हाणें मांडायला ब्रह्मदेवाकडे गेला. हीं सर्व गाऱ्हाणीं ब्रह्मदेवांनीं शांतपणें ऐकून घेतलीं व ते म्हणाले, 'हे सहस्रनेत्रदायी भगवंता, आपण आणलेलें गाऱ्हाणें क्षीरसागराजवळ जाऊन भगवंतांच्या कानांवर घालावें म्हणजे आपल्याला यश येऊन आपलें कार्य सिद्धीस जाईल. कारण फक्त तेच जगदुद्धारक आहेत.'

हें ब्रह्मदेवांचें बोलणें ऐकून घेऊन सर्व देव, ऋषि, मुनि व इतर प्रजाजन क्षीरसागराच्या कांठीं [illegible] हात जोडून शेषशायी परमेश्वराची प्रा



IRBK-0116553



'हे देवाधिदेवा, आतां पृथ्वीवर असंख्य पापें होऊं लागलीं आहेत. प्रजेला जगणें मुष्किल होऊं लागलें आहे. दैत्य अत्यंत माजूं लागले आहेत. तरी आपण आतां या सर्वांचें व धर्माचें कृपा करून रक्षण करावें अशी आमची नम्रभावें आपल्या चरणीं प्रार्थना आहे. वेळींच पृथ्वीची या सर्व संकटांतून सुटका करण्यास फक्त आपणच समर्थ आहांत.' ही प्रार्थना संपवून सर्वजण स्थिर उभे राहिले. तोंच सागरांतून आकाशवाणी झाली, 'मुळींच भिऊं नका. मी लवकरच यादव कुळांत जन्म घेऊन दुष्टांचा संहार करणार आहें, तरी आतां देवानीं यादव कुळांत व उपदेवांनीं गोकुळांत गोपाळांच्या घरीं जन्म घ्यावा. वायु, यम, इंद्र आणि अश्विनीकुमार यांनीं कुंतीच्या पोटीं जन्म घ्यावा. तसेंच बृहस्पतीनें द्रोणाचा जन्म घेऊन पांडवांना विद्या शिकवून पारंगत करावें. मी स्वतः वसुदेवाची पत्नी देवकी हिच्या पोटीं जन्म घेणार आहें. कारण तीन जन्म त्यांनीं तप केलें आहे. तें मी आतां सफल करणार आहें.'

ही आकाशवाणी ऐकतांच सर्व देवांना व इतरांना अत्यानंद झाला. त्यांनीं देवाच्या नांवाचा जयजयकार करून त्याला साष्टांग

नमस्कार घातला. स्वत:ला इतके दिवस लागलेली काळजी आतां दूर होणार या आनंदानें सर्वजण आपापल्या ठिकाणीं निघून गेले.

पुढें यदु वंशांतील शूरसेन नांवाच्या राजाला एक मुलगा झाला. त्याचें नांव वसुदेव ठेवण्यांत आलें. तो जन्मला त्यावेळीं देवांनीं दुंदुभि वाजवल्या म्हणून त्याचें नांव आनक दुंदुभि असेंहि ठेवलें. याचें कारण असें होतें कीं, आपला आनंद प्रदर्शित करण्यासाठीं देवांनीं त्या वाजविल्या होत्या. प्रत्यक्ष परमेश्वर त्याच्या पोटीं जन्म घेणार होते.

वसुदेव आतां मोठा झाला. योग्यवेळीं त्याचें लग्न मथुरेचा राजा उग्रसेन यांची कन्या देवकी हिच्याबरोबर करण्याचें ठरलें. शूरसेनाला आनंद झाला तो मथुरेंत मोठ्या थाटामाटांत हजर झाला.

पुढें उग्रसेनाचा मुलगा कंस यानें त्याची लग्नानंतर थाटांत मिरवणूकहि काढली. वरात जात असतां एकाएकीं आकाशवाणी झाली, 'अरे अभाग्या कंसा, तूं आतां मरणांतून सुटत नाहींस. तूं फार उन्मत्त झाला आहेस. तुझी बहीण देवकी हिच्या पोटीं येणारा आठवा मुलगा तुझा वध करील.' हें ऐकतांच कंसानें वरात थांबवली. त्यानें मंगलवाद्यें बंद करवलीं. तो उठला. त्यानें देवकीचे केंस धरले व तिला रथाखालीं ओढलें. त्यानें शस्त्र उचलून तिच्यावर मारण्यासाठीं हात उचलला तोंच देवकी त्याला तसें न करण्याविषयीं विनवूं लागली. उग्रसेनाला तर काय करावें हेंच सुचेना. याचवेळीं वसुदेव रथासमोर उभा राहिला व म्हणाला, 'कंसा, हिला मारूं नकोस. हिला होणारीं सर्व अपत्यें तुझ्या स्वाधीन करण्याचें मी वचन देतों.' कंसानें हें ऐकतांच त्या दोघांना तिथेंच बेड्या घालून बंदिशाळेंत पाठवून दिलें.

ठरल्यावेळीं देवकी प्रसूत झाली. वसुदेवानें तें सुंदर बाळ कंसापुढें ठेवलें. परंतु कंसाला दया वाटून व अजून सात अपत्यें होणार आहेत तेव्हां सोडून द्यावें या विचारानें त्यानें त्याला परत पाठवलें.

परंतु यामुळें कंसाचा वध करणें अवघड गेलें असतें. नारद यावेळीं कंसाच्या सभेंत हजर झाले. कंसानें त्यांची पूजा करून सर्व वृत्तांत सांगितला. तें ऐकून नारद म्हणाले, 'अरे वेड्या कंसा, तूं

आतां सपशेल फसला आहेस. अरे, तुझा वध करणारा आठवा शत्रु हा उलटीकडून मोजलें तर आठवाच नव्हे का ? तोच तुझा शत्रु नसेल याची खात्री काय ?'

हें ऐकतांच कंसानें विचार केला कीं, सर्व अपत्यांची हत्या करायची. काय नेम त्याचा शत्रु केव्हांहि जन्माला येईल. इकडून तिकडून आठवा सारखाच.

त्यानें नारद जातांच लागलीच बंदिशाळेंत जाऊन त्या बाळाला देवकीच्या कुशींतून हिसकावून घेतलें व शिळेवर नेऊन आपटलें. तत्काळ तें बाळ मृत झालें. पहिल्या अपत्याचा स्वतःच्या भावानें असा निर्दयपणें वध करावा याचें तिला अपरंपार दुःख झालें, पण करणार काय विचारी !

पुढें कंसानें अशींच तिचीं सहा बाळें मारलीं.

## २. बलराम–श्रीकृष्ण यांचा जन्म

देवकीच्या सहाहि अपत्यांचा वध कंसानें केला. असंख्य पापांच्या राशी कंस रचूं लागला. गोब्राह्मणांचा अनन्वित छळ सुरू झाला. हें पहातांच भगवान शेषाला म्हणाले, 'आतां मला हीं पापें पहावत नाहींत. तेव्हां आपण दोघेंहि आतां अवतार घेऊन या पाप्यांना प्रायश्चित्त द्यायला लावून, दुष्टांचा संहार करून, भक्त व गुणीजनांचे संरक्षण करूंया.' हें ऐकतांच शेषशायी म्हणाले, 'नको बाबा, मी आतां अवतार घेणार नाहीं. मागील अवतारांत मी तुझा धाकटा भाऊ लक्ष्मण होऊन असंख्य यातना सहन केल्या आहेत. तरी आतां आपणच फक्त अवतार घेऊन स्वतः काय करायचें तें करावें.'

हें उत्तर ऐकून श्रीभगवान हंसले व हळूच प्रमानें म्हणाले, 'असें कसें ? अरे. तूं माझा प्राण आहेस. तुझ्याशिवाय मला करमत नाहीं. वाटल्यास या अवतारांत तूं माझा मोठा भाऊ हो. मी तुझी आज्ञा पाळीन. तूं मागील अवतारांत केलेल्या माझ्या सेवेवर मी तुझ्यावर अतिशय संतुष्ट झालों आहें. तरी आतां विलंब न लावतां तूं देवकीच्या गर्भांत प्रवेश कर. तुझ्या मागोमाग मी योगमायेला

पाठवतों. ती तुला देवकीच्या गर्भांतून काढून गोकुळांत रोहिणीच्या उदरीं नेऊन ठेवील. नंतर माया यशोदेच्या उदरीं राहील व मी देवकीच्या उदरीं जन्म घेण्यासाठीं जाईन. पुढें मी जन्म घेतांच गोकुळांत नंदाच्या घरीं येईन व तुला भेटेन.'

हें ऐकतांच शेषानें श्रीभगवानांना नमस्कार केला व तो अवतार घेण्यासाठीं पृथ्वीवर गेला. त्यानें देवकीच्या उदरांत प्रवेश केला. ही आतां देवकीची सातवी खेप होती. गर्भाची वाढ पोटांत होऊं लागतांच देवकी वसुदेवाला म्हणाली, 'महाराज, या खेपेच्या गर्भांत आणि माझ्या डोहाळ्यांत कांहींतरी नवल घडत आहे. मला वाटत आहे कीं, पृथ्वीला उचलावें, आकाशाला टेकू द्यावा आणि सातहि सागर नखाग्रांत सांठवावे. तसेच हातांत नांगर व मुसळ घेऊन सर्व दैत्यांचा व कंसाचा संहार करावा. माझ्या अंगांत आतां भलताच उत्साह व नवचैतन्य निर्माण झालें आहे.'

हें ऐकून वसुदेव म्हणाला, 'परमेश्वराची लीला अगाध आहे. त्याच्या कृपेनेंच तर आपण जिवंत आहोंत. जें होईल तें बऱ्यासाठींच होईल यांत शंका नाहीं.'

एके रात्रीं वसुदेव–देवकी गाढ निद्रेंत असतांना आदिमायेनें देवकीच्या पोटांतला गर्भ आपल्या अद्‌भुत सामर्थ्यानें काढला व गोकुळांत वसुदेवाची दुसरी पत्नी रोहिणी हिच्या उदरीं ठेवला. रोहिणी ही कंसाच्या भीतीनें गोकुळांत लपून रहात होती.

नित्याप्रमाणें रोहिणी सकाळीं उठून पहाते तों तिला स्वतःला सात महिन्यांची गरोदर असल्याचें कळून आलें. आपली ही अशी स्थिति झालेली जर जगाला कळली तर काय होईल या भीतीनें ती घाबरली. नंद–यशोदेलाहि ही बातमी कळली. सर्वजण मोठ्या बिकट संकटांत सांपडलीं. ही नसती चिंता गोकुळांत निर्माण झाली. परंतु एवढ्यांत आकाशवाणी झाली, 'रोहिणी, घाबरूं नकोस. मुळींच चिंता करूं नकोस. दैत्यांचा संहार करण्यासाठीं प्रत्यक्ष शेष तुझ्या पोटीं अवतारणार आहे. तो गर्भ वसुदेवाचाच आहे.'

ही आकाशवाणी ऐकतांच सर्वांना आनंद झाला. पुढें नऊ मास पूर्ण झाल्यावर रोहिणीला सुंदर पुत्ररत्न प्राप्त झालें. मग लागलीच

नंदानें जातक वर्तवून त्याचें बलभद्र असें नांव ठेवलें. पुढें नंदाची पत्नी यशोदा हीसुद्धां गरोदर झाली आणि तिच्या उदरीं आदि-मायेनें अवतारकार्यासाठीं प्रवेश केला.

तिकडे नित्याप्रमाणें देवकी जागी झाली. पण पहाते तों तिचें पोट हलकें झालें होतें. ती घावरली. तिनें वसुदेवाला हें सांगितलें. तो म्हणाला, 'परमेश्वराची करणी अगाध आहे. कंसाच्या भीतीनें कदाचित् गर्भ जिरला असेल.'

दूतांनीं ही वार्ता कंसाच्या कानांवर घालतांच कंस म्हणाला, 'बरें झालें. आतां आपण जास्त काळजी घ्यायला हवी. कारण आतां आपला शत्रु आठवा जन्माला येणार. सर्वत्र कडक बंदोवस्त ठेवा.' त्याची आज्ञा घेऊन दूत निघून गेला. तिकडे वसुदेव-देवकी-वर अत्यंत कडक पहारा ठेवण्यांत आला. परंतु इकडे कंसाची परिस्थिति मात्र केंविलवाणी झाली. त्याला चोहींकडून देवकीचा गर्भ दिसूं लागला. जळीं, स्थळीं, काष्ठीं व पाषाणीं त्याला सर्वत्र भीति वाटूं लागली. त्याला अन्न गोड लागेना, झोंप येईना. तो चिंताग्रस्त झाला. त्याचें मन अतिशय अस्वस्थ झालें.

तिकडे भगवंतांनीं लक्ष्मीला विदर्भ देशचा राजा भीमक याच्या राणीच्या उदरीं जन्म घेण्यास सांगितलें. त्यांनीं स्वतः मथुरेस जाऊन देवकीच्या उदरांतील गर्भांत प्रवेश केला. प्रत्यक्ष परमे-श्वरानें देवकीच्या उदरांतील गर्भांत प्रवेश करतांच, तिचें रूप पालटूं लागलें. तिचें शरीर दिव्य तेजानें झळकूं लागलें. तिची चिंता दूर होऊन ती आतां जास्त उत्साही व आनंदी दिसूं लागली. ती आतां स्वतःची काळजी करण्याचें विसरूं लागली.

हें सर्व पहात असतां वसुदेव तिला म्हणाला, 'कमाल आहे तुझी. वास्तविक पहातां हा आठवा गर्भ. तूं जास्त काळजींत असायला पाहिजेस. पण तूं तर जास्त उत्साही व निश्चित दिसत आहेस. तुझा भाऊ कंस तुझ्या मुलाच्या जन्माची वाट पहात बसला आहे. तुझा या खेपेचा आनंद पाहून मला जरा आश्चर्य वाटतें आहे.' हें त्याचें बोलणें ऐकतांच देवकी दंड ठोकीत उभी राहिली व म्हणाली, 'मला कुणाची भीति नाहीं. मी कंस, मुष्टिक,

चाणूर वगैरेंचा संहार करणार आहें. एवढेंच नव्हे तर मी सर्व दुष्ट दैत्यांचा संपूण संहार करून भूमीचा भार हलका करणार आहें. मी कंसाची बंदिशाळा फोडून सर्व राजांची तत्काळ मुक्तता करणार आहें. कुठें आहे माझें धनुष्य आणि बाण ! आणा लवकर. मी– जरासंधाबरोबर युद्ध करून त्याला सतरां वेळां रथाला बांधून फरफटत आणणार आहें. भौमासुराचा वध करून काल-वयनाचें मी पूर्ण भस्म करणार आहें. मी माझ्या भक्तांचीं संकटें दूर करणार आहें. मी माझ्या भक्ताच्या रथाचा सारथी होऊन सर्व दुष्टांचा संहार करणार आहें. मी तर परब्रह्म आहें.'

हें ऐकतांच वसुदेव जास्त काळजींत पडला. तो म्हणाला, 'देवकी, कृपा करून आतां शांत हो हें तुझें बोलणें व गर्जना जर कुणीं ऐकली तर एखादें मोठें संकट आपल्यावर येईल.' हें ऐकतांच देवकी गर्जना करीत म्हणाली, 'काय, मी शांत होऊं? तें शक्य नाहीं. मला कुणाची भीति नाहीं. मी पूर्ण परब्रह्म आहें. मी प्रलयकाळांचा नियंता व शास्ता आहें. आदिमायेला तर मींच निर्माण केलें आहे.' हें बोलणें संपल्यावर देवकी हळूहळू शांत झाली. या तिच्या गर्जनेनें देव संतुष्ट झाले. ते दुदुंभि वाजवूं लागले. त्यांनी गुप्तपणें येऊन बंदिशाळेंत प्रवेश केला व हात जोडून, देवकीला प्रदक्षिणा घालून तिच्या गर्भाची स्तुति केली. कारण प्रत्यक्ष भगवान् आतां जन्म घेणार होते. देव निघून गेले.

पुढें कंसानें दासीकरवीं देवकीच्या गर्भाची चौकशी केली. त्याला कळविण्यांत आलें कीं, देवकीला आतां नऊ महिने लवकर पूर्ण होत आहेत. हें कळतांच कंस बंदिशाळेंत जाऊन देवकीच्या समोर उभा राहिला. परंतु देवकी संपूर्ण देवस्वरूप झाली होती. कंसाला या गोष्टीची कल्पना आली असावी. कारण त्याला तेथें देवकीऐवजीं शंख, चक्र, गदा व पद्म धारण केलेलें विष्णूचें रूप दिसूं लागलें.

त्या देवकीच्या ठिकाणीं तर तेजःपुंज सुदर्शनचक्र हातांत घेऊन उभी असलेली विष्णूची दैदिप्यमान मूर्ति दिसूं लागली. हें पहातांच कंस घाबरला. त्याला दरदरून घाम फुटला. त्याच्या तोंडाला



कोरड पडली. त्यानें भीतीनें भयंकर किंकाळी फोडली व तो थरथर कांपत, वाटेल तें वडवडत, पळत, धडपडत कसातसा स्वतःच्या मंदिरांत येऊन पोंचला. त्यानें जमिनीवर एक मोठें शस्त्र आपटलें व म्हणाला, 'मी देवकीच्या आठव्या मुलालाहि आपटून ठार करणारच, ज्यानें मला अस्वस्थ केलें आहे त्याचा मी संहार केल्याशिवाय रहाणार नाहीं. मी त्याला संपूर्ण गिळूनसुद्धां टाकायला कमी करणार नाहीं.'

परमेश्वरानें श्रावणाच्या कृष्णपक्षांतील अष्टमीच्या दिवशीं बुधवारीं मध्यरात्रीं रोहिणी नक्षत्रावर देवकीच्या पोटीं लहान बाळाच्या रूपानें जन्म घेतला. त्यामुळें सर्वत्र लखलखाट झाला. देवकीनें लागलीच त्या बाळाला गोकुळांत नेण्यासाठीं वसुदेवाला विनंति केली. त्या बाळाच्या पायांच्या तळावर वज्र, ध्वज, पक्ष आणि अंकुश हीं चिन्हें होतीं. तें सुकुमार रूप देवकीनें डोळे भरून पाहून घेतलें. वसुदेवानें कृष्णबाळाला उचललें व कोणतीहि आडकाठी न येतां गोकुळांत यशोदेजवळ अलगद नेऊन ठेवलें व आदि-

मायेला घेऊन तो परत आला.

परमेश्वराच्या पदस्पर्शानें यमुना नदी पावन झाली होती व मुसळधार पावसांत तिनें वसुदेवाला वाट मोकळी करून दिली होती.

ज्यावेळीं वसुदेव त्या कन्यारूपी आदिमायेला बंदिशाळेंत घेऊन आला त्यावेळीं तिनें मोठ्यांदां किंकाळी मारून कोलाहल माजविण्यास सुरुवात केली. तिचें रडणें, ओरडणें ऐकतांच सेवकांनीं कंसाला हें वृत्त सांगितलें. लागलीच कंस पशूसारखा धांवत बंदिशाळेंत हजर झाला व म्हणाला, 'सांग कुठें आहे माझा शत्रु?' हें ऐकतांच देवकी त्याला म्हणाली, 'दादा, अरे माझें एवढें अपत्य तरी मारूं नकोस. मी तुझ्या पायां पडतें. त्याला जीवदान दे.' असें म्हणून देवकीनें कन्येला हृदयाशीं कवटाळलें. परंतु सूडाच्या भावनेनें संतप्त झालेल्या कंसानें तें अपत्य मुलगा आहे किंवा मुलगी आहे हें न पहातांच त्याच्या पायाला धरून अंतराळांत गरगर फिरविण्यास प्रारंभ केला. तो आतां त्याला उंबरठ्यावर आपटणार तोंच आदिमाया त्याच्या हातांतून निसटली व आकाशांत निघून गेली.

कंसानें वर पाहिलें तों ती महाशक्ति अतिशय तेजानें तळपत अंतराळांत जात असलेली त्याला दिसली.

ती तेजानें तळपणारी शक्ति त्या कंसाला म्हणाली, 'अरे नीचा, दुष्टा, दुराचारी कंसा, मला काय ठार मारतोस? तुझा शत्रु पृथ्वीवर केव्हांच जन्मला आहे.' हें ऐकून कंस कावराबावरा झाला. तो भयभीत झाला व हताश होऊन आपल्या मंदिरांत परत गेला.

त्या दिवसापासून तर कंसाची सपशेल झोंपच उडाली. अहोरात्र त्याला त्या शत्रूची भीति वाटूं लागली. तो कुठें जन्मला असावा, केव्हां, कोणत्या ठिकाणीं या सर्व गोष्टींचा तो अंदाज करूं लागला. तो दिसेल त्या अधिकाऱ्याला, सेवकाला, कारभाऱ्याला म्हणूं लागला, 'तुम्ही सारे मला मारायला टपलेले आहांत.' तो त्यांच्या अंगावर धांवूनहि जाऊं लागला. त्याच्या अगोदरच्या उन्मत्त आणि घमेंडखोर स्वभावांत आणखीं या वरील गोष्टींची भर पडली. त्याला कोणत्याच गोष्टींत कांहींच सुख वाटेनासें झालें.

## ३. श्रीकृष्ण जन्मोत्सव, महाबलीची फजिती आणि पूतनेचा वध !

तिकडे गोकुळांत प्रवेश करतांच श्रीकृष्णानें यशोदेच्या कुशींत प्रवेश केला. यशोदा जागी होऊन पहाते तों तिच्या कुशींत नुकतेंच जन्माला आलेलें बाळ दिसलें. त्याच्या रूपाकडे पहातांच यशोदेला शतजन्मांची पुण्याई फळाला आल्यासारखी वाटलें. तें बाळहि हळूच हंसलें. यशोदेला मुलगा झाला ही बातमी कळतांच सर्व आनंदानें न्हाऊन निघाले. ती बातमी कळतांच रोहिणी व इतर गौळणी नंदाच्या वाड्यांत जमल्या. गवळी, ब्राह्मण व इतर लोक पुत्रदर्शनासाठीं जमले. नाना प्रकारचीं मंगलवाद्यें वाजूं लागलीं. हा सर्व सोहळा पहाण्यासाठीं आकाशांत देवांची गर्दी जमली. नंदाचे कुलोपाध्याय गर्गमुनि तर सर्वांच्या अगोदर धांवत जाऊन तेथें हजर झाले होते.

नंतर नंदानें मंगलस्नान केलें व गर्गमुनि व इतर ब्राह्मणांसह तो यशोदेच्या मंदिरांत गेला. त्यानें पुण्याहवाचन करून श्रीकृष्णाच्या मुखांत मध घातला. आपल्या पुण्याईचें फळ आपल्याला लाभलें असें त्याला वाटलें.

या प्रसंगीं नंदानें दोन लाख गाई, असंख्य बहुमोल अशीं रत्नें, दिव्य अलंकार आणि वस्त्रांचें दान केलें. तेथें जमलेल्या लोकांनीं नंदाला आहेर अर्पण केले. गौळणींनीं यशोदेला अनेक वस्त्रें देऊन तिचा जयजयकार केला. प्रत्येक गौळण बाळाचें रूप पाहून वर्णन करूं लागतांच यशोदेनें बाळाला पदराखालीं लपवलें. ज्या मंदिरांत श्रीकृष्णाचा जन्म झाला तेथें सर्व केशरकस्तुरींनीं सारवण्यांत येऊन वर सुंदर चांदवे लावण्यांत आले. सभोंवतालीं मोठाल्या झालरी सोडण्यांत आल्या. मध्यभागीं रत्नजडित पलंग ठेवून त्यापुढें रत्नखचित चौरंग ठेवण्यांत आला. दोन्ही बाजूस दोन गौळणी उभ्या राहून तिच्यावर श्वेतचामरें ढाळूं लागल्या. थोड्याच वेळांत गर्गमुनि अनेक ब्राह्मण व पंडितांसह तेथें आले. त्यांनीं श्रीकृष्णाचें मुखकमल पाहिलें. त्यांनीं त्याचें जातक सांग-

ण्यास सुरुवात केली. .ते म्हणाले, ' यशोदामाई, तुझें भाग्य थोर म्हणून प्रत्यक्ष भगवान तुझ्या पोटीं जन्माला आले आहेत. त्याला जरी असंख्य वैरी असले तरी तो त्यांचा संहार करीलच. एक स्त्री स्वत:च्या स्तनास विष लावून याला पाजायला आली तरी हा तिलाच शोषून टाकील. एक दैत्य वायुरूपानें याला आकाशांत उडवील, पण हा त्यालाहि ठार मारील. एक मोठा गाडा जरी याच्या अंगावर आला तरीहि तो त्याचा संपूर्ण चुराडा करून टाकील. जरी दोन वृक्ष याच्यावर कोसळून पडले तरी याला कांहीं इजा न होतां हा सुरक्षित राहील. याला पाण्यांतील महासर्पापासून भय असलें तरी तो त्याचें मर्दन करील. याला सापानें गिळलें तरी तो पोट फोडून बाहेर येईल. बारा योजनें अफाट पसरलेला अग्नि हा विझवून टाकील आणि एका नखाग्रावर संपूर्ण पर्वत उचलून धरील. हा ब्राह्मणांचें व गाईंचें रक्षण करील. सर्व नीच दुष्ट दैत्यांचा संहार करून बंदिशाळेंत ठेवलेल्या सर्व राजांची हा सुटका करील. ज्या गुरूकडे हा विद्या शिकेल त्यांचा मेलेला मुलगा त्यांना परत आणून देईल. हा समुद्रांत नवीन अशी अद्भुत नगरी बांधील. हा एका महादैत्याचा संपूर्ण संहार करून एक पट्टराणी करील आणि सोळा हजार स्त्रियांशीं लग्न करील. या सर्वांपासून त्याला असंख्य संतति होईल. हा भक्तांचा कैवारी होईल. कोणत्याहि प्रकारचा कमीपणा न धरतां हा धर्मराजाच्या घरीं उष्टीं काढील. आणि स्वत:च्या भक्ताच्या रथाचा सारथी होईल. हा आपल्या सर्व गोत्रजांचा उद्धार करील.' हें गर्गमुनींचें जातक ऐकतांना जमलेली मंडळी खरोखर तटस्थ झाली. ज्यावेळीं गर्गमुनि हे सांगत होते तेव्हां श्रीकृष्ण स्तनपान करीत होता. गर्गमुनींचें जातक सांगणें होतांच तो त्यांच्याकडे पाहून हंसला, जणूं कांहीं गर्गमुनि खरेंच जातक सांगत होते.

असा हा सुंदर सोहळा बारा दिवस चालला व तेराव्या दिवशीं यथाविधि श्रीकृष्णाला पाळण्यांत ठेवून त्याचें श्रीकृष्ण असें नांव ठेवण्यांत आलें. गर्गमुनि व इतर ब्राह्मणांची पूजा करून त्यांना सर्व प्रकारचीं दानें देऊन संतुष्ट करण्यांत आलें.

श्रीकृष्णाच्या जन्मापासून सर्वत्र आनंदीआनंद आणि समृद्धि होऊं लागली. जिकडे तिकडे उत्साहाचें वातावरण पसरलें.

परंतु मथुरेंत मात्र दुश्चिन्हें दिसूं लागलीं. कंसाच्या राजवाड्याच्या दारापाशीं येऊन कुत्रीं रडूं लागलीं. सभागृहांत विजा पडूं लागल्या. भूकंपाचे धक्के बसूं लागले ढगांतून रक्ताचा पाऊस पडूं लागला. असाच एकदां कंस आपल्या राज्यसभेंत बसला असतां त्याचा मुकुटच खाली पडला. एकदां तर त्याच्या छत्राचा दांडाच मोडून तें खालीं कोसळलें. त्यावेळेस कंसाला अतिशय वाईट स्वप्नें पडूं लागलीं. त्याची भूक, तहान, झोंप नाहींशीं झाली. स्वत:चा शत्रु कुठें जन्मला याचा तो अंदाज घेत असतां महाबली नांवाचा दैत्य म्हणाला, 'महाराज, मी गोकुळांत जाऊन आपल्या शत्रूचा शोध लावतों आपण मला तशी आज्ञा द्यावी.' हें ऐकतांच कंसाला आनंद झाला व त्यानें त्याला वस्त्राभूषणें देऊन गौरव केला. महाबलीनें आपलें रूप बदलून ब्राह्मणाचें रूप धारण केलें.

तो गोकुळांत हजर झाला. त्यानें ब्राह्मणासारखें धोतर नेसून खांद्यावर दुसरें धोतर घेतलें होतें. गळ्यांत जानवेंहि घातलें होतें. तसेंच कपाळावर टिळा लावून हातांत पंचांगहि घेतलें होतें. गोकुळांत त्यानें हळूच नंदाच्या गृहांत प्रवेश केला. नंदाला वाटलें हा ब्राह्मणच आहे. त्यानें त्याची पूजा करून त्याला बसायला आसन दिलें. यावेळीं यशोदा कृष्णाला पाजीत होती. ती त्या कपटी ब्राह्मणाला म्हणाली, 'महाराज, आपल्या हातांत पंचांग दिसतें आहे. तरी या बाळाचें जातक सांगावें. गर्गमुनींनीं तर याचें जातक फारच चांगलें सांगितलें आहे.'

हें ऐकतांच महाबली पंचांग उघडायचें सोंग करून त्यानें सांगितलें, 'गर्गमुनींनीं याचें भविष्य मुळीं खोटें सांगितलें आहे. अहो, हा तर मूळनक्षत्रावर जन्माला आला आहे. हा सर्वांच्या सत्यानाशाला कारण होणार आहे. तरी या अशा दिवट्या पोराला त्वरित गोकुळाबाहेर नेऊन खड्डा करून त्यांत जिवंत पुरून टाका. हा तुमचा बाळ नसून काळ आहे. हा सर्व गोकुळाचा नाश करणारा आहे.' हें त्याचें भाषण संपतें न संपतें तोंच त्याच्या



डोक्यावर एक मोठें दह्याचें मडकें येऊन आदळलें आणि त्याच्या मुखांत एक लाटणें येऊन शिरलें. एवढ्यानेंच न संपून घरांतून देव्हारे, पाटे, वरवंटे वगैरे वस्तु बाहेर पडून त्या दुष्ट महावलीवर हल्ला करूं लागल्या. सुटका करून घेण्यासाठीं महावली उठून पळून जाऊं लागतांच वाटेनें दारावरच बाज आडवी आली. पुढें कुदळी, कुऱ्हाडी, मुसळें वगैरेहि त्याच्यावर हल्ला करूं लागले.

या प्रकारानें त्याचें धोतर सुटलें, पंचांग कुठल्या कुठें उडालें, जानवें तुटून एका बाजूला पडलें आणि नागड्या स्थितींत महाबली कसाबसा जीव घेऊन मथुरेस पोहोंचला. हा सर्व प्रकार पहातांच लोक म्हणाले, 'बरें झालें. त्याच्या नीच वाचेचें व कर्माचें फळ त्याला आत्तांच मिळालें.'

महावलीनें घडलेलें सर्व वृत्त कंसाला सांगितलें. स्वत:चें मरण आतां जवळ आलें असें वाटून कंस म्हणाला, 'तुम्ही सर्वजण माझ्याजवळ असतां एकालाहि त्या माझ्या शत्रूचा नायनाट करण्याचें सामर्थ्य नाहीं? धि:कार असो तुमचा!'

हें ऐकतांच पूतना नांवाची राक्षसीण पुढें आली व कंसाला

म्हणाली, 'कंसमहाराज, आपण मुळींच काळजी करूं नका. मी कपटविद्येंत तरबेज आहें. मला आज्ञा देतांच मी एका क्षणांत कृष्णाचा नाश करून परत येईन. ही माझी प्रतिज्ञा आहे.' हें ऐकून कंसाला धीर आला. त्याला आनंदहि झाला. त्यानें पूतनेला वस्त्रें–भूषणें देऊन तिचा गौरव केला व निरोप दिला. कंसाला वाटलें आतां आपण खचित निर्धास्त होणार.

लगेच पूतनेनें सुंदर स्त्रीचें रूप धारण केलें. पायांत झुम्झुम् आवाज करणारे पैंजण बांधले, डोळ्यांत काजळ घातलें आणि अंगावर विविध प्रकारचे अलंकार घातले. हे सर्व घालतांच ती अतिशय सुंदर आणि आकर्षक दिसूं लागली. जणूं काय रंभाच! तिला अति लावण्यवती पहातांच कंस आनंदानें म्हणाला, 'वाऽ सुंदर! तूं आतां गांवोगांव जीं सांपडतील तीं मुलें ठार करीत जा. त्याच मुलांत तुला माझा शत्रूहि सांपडेल. त्याला तूं ठार कर.' हें ऐकतांच पूतनेला अत्यानंद झाला. तिच्या अंगांत जणूं काय वारेंच संचारलें! ती अत्यंत उत्साहानें आपल्या कामाला लागली. ती मथुरेंतून बाहेर पडली आणि या ना त्या प्रकारचीं आमिषें दाखवून मुलांचे प्राण घेऊं लागली. हें तिचें कृत्य लोकांच्या नजरेंत आलें नाहीं. कारण तिच्या रंगरूपावरून ती तसें करील असें त्यांना वाटणें शक्यच नव्हतें. असें करीत करीत ती गोकुळांत शिरली आणि लहान मुलांना स्तनपान करूं लागली. बिचारीं मुलें दूध पितांच प्राण सोडूं लागलीं.

आणि असें करतां करतां ती यशोदेच्या मंदिरांत आली. तिच्या रूपाला पाहून ती कृष्णाला पहायला आली असावी असें यशोदेला वाटलें. तिला आनंद झाला. पूतना श्रीकृष्णाच्या अगदीं पाळण्याजवळ गेली व कृष्णाकडे पाहून म्हणूं लागली, 'किती सुंदर गोजिरवाणें बाळ आहे हें! असें सुंदर बाळ त्रैलोक्यांतसुद्धां पहायला मिळायचें नाहीं. किती गोड हंसतो आहे हा छबकडा! अरे लबाडा, ये माझ्याजवळ.' असें म्हणत तिनें त्याला उचललें व आपल्या स्तनाजवळ त्याचें मुख नेलें. श्रीकृष्णानें आपला एक हात पूतनेच्या खांद्यावर टाकला व दुसऱ्या हातानें तिचें स्तन

धरून मोठ्या आवडीनें स्तनपान करूं लागला.

पूतनेनें तेथें येण्यापूर्वी वरेंचसें विष स्तनांत भरलें होतें. श्रीकृष्णांनीं तें सर्व विष शोषून घेतलें आणि तसेंच दूधहि. परंतु गप्प न वसतां त्यानें आपलें शोषणाचें काम चालूंच ठेवलें. या कृष्णाच्या शोषणानें तिच्या शिरांना जबरदस्त ओढ लागूं लागली. तिला वेदना होऊं लागल्या तिचा जीव कासावीस होऊं लागला. ती घाबरली. तिचें सर्वांग थरथर कांपूं लागलें.

तिनें श्रीकृष्णाची प्रार्थना आरंभली. ती म्हणाली, 'हे बाळा, आतां मला सोड. माझा जीव आतां कासावीस होऊं लागला आहे. हे सर्वोत्तमा, मी तुझ्या गोकुळांत कधीं पाऊलदेखील ठेवणार नाहीं. मी तुझ्या पायां पडतें. माझी चूक झाली.' ती जरी श्रीकृष्णाला आळवीत होती तरी श्रीकृष्ण तिला सोडेना. त्यानें तिचीं सर्व गात्रें शोषून टाकलीं. शेवटीं मूर्च्छा येऊन ती जमिनीवर पडली. तिनें जेव्हां डोळे किलकिले करून पाहिलें तेव्हां श्रीकृष्ण तिच्या हृदयावर बसलेला असून स्तनपान करीत आहे. ह्या सुंदर मूर्तीच्या परम मनोहर रूपाला पाहून तिनें तें आपल्या हृदयांत सांठवलें आणि अखेर 'श्रीकृष्ण' असें म्हणून आपला देहत्याग केला. परंतु तिचें खरें रूप तेथें प्रगट झालें. यशोदा त्या ठिकाणीं येऊन पहाते तों काय, ती राक्षसीण मरून पडलेली तिला दिसली. तिनें सर्वांना हांका मारून जमा केलें. तें विचित्र महाप्रचंड धूड पहातांच सर्वांना मोठें आश्चर्य वाटलें. शेवटीं तिचें धूड मोठें होतें त्यामुळें दरवाजांतून बाहेर नेणें शक्य झालें नाहीं. गवळ्यांनीं कुऱ्हाडी आणून तिचे तुकडे केले व बाहेर नेऊन त्यावर अग्निसंस्कार केले. परंतु घाण न सुटतां अद्भुत सुवासानें सर्व दिशा भरून गेल्या.

## ४. शकटासुर व तृणावर्त वध

कंसाला पूतनेच्या मृत्यूची बातमी समजतांच तो अतिशय घाबरला. त्याला कांहींएक सुचेनासें झालें. नंद जेव्हां गोकुळांत आला तेव्हां त्याला पूतनेच्या मरणाची व इतर घडलेली हकीकत कळली. त्यानें लागलीच श्रीकृष्णाला उचलून घेतलें व हृदयाशीं धरलें.

श्रीकृष्ण संकटांतून वांचला म्हणून त्यानें मोठा उत्सव केला. श्रीकृष्ण आतां रांगायला लागलेला पाहून तर नंदाला जास्तच आनंद झाला व त्यानें त्याप्रीत्यर्थ उत्सव करून दानधर्म केला.

एक दिवस यशोदा अंगणांत श्रीकृष्णाला पाळण्यांत निजवून घरांत गेली असतां शकटासुर नांवाचा एक राक्षस तेथें आला. तो त्या संधीची वाटच पहात होता. तो गुप्त रूपानें उभा असल्यानें कोणाला त्याची कल्पना आली नाहीं. श्रीकृष्ण एकटाच आहे हें पहातांच त्यानें गाड्याचें रूप घेतलें व तो अंगावर लोटला आणि श्रीकृष्णाचा तो त्याच्याखालीं रगडून प्राण घेण्याचा प्रयत्न करूं लागला. परंतु कृष्णानें त्याच वेळीं आपला एक पाय झाडला आणि त्याच्या नुसत्या स्पर्शानें त्या गाड्याचा सपशेल चुराडा झाला. परंतु परमेश्वराच्या चरणस्पर्शानें शकटासुर मात्र उद्धरून गेला.



थोड्या वेळानें यशोदा व नंद येऊन पहातात तों काय, तेथें गाड्याचा चुराडा त्यांना दिसला. त्या भयंकर गाड्याला तेथें आणलें तरी कुणीं याची त्यांना कल्पना आली नाहीं. जर तो श्रीकृष्णाच्या अंगावरून गेला असता तर बाळाचें काय झालें असतें ही कल्पना येतांच नंद यशोदेला म्हणाला, 'हें पहा, श्रीकृष्णावर अलीकडे अशीं अनपेक्षित संकटें येऊं लागलीं आहेत. तरी याला आतां एक क्षणभरहि कुठें सोडूं नये. केवळ प्रभूची कृपा म्हणूनच हा आजचा प्रसंग टळला.' त्या गाड्याचा चुरा झाला ही परमे-

श्वराची कृपा झाली असें सर्वांना वाटलें.

श्रीकृष्ण आणि बलराम दोघेहि आतां एकमेकांचा हात धरून खेळूं लागले. त्यांच्याभोंवतीं नंद, यशोदा, रोहिणी व गौळणी-सुद्धां नाचूं लागल्या. एक गोरा तर दुसरा श्यामवर्ण अशीं रूपें पाहून त्यांना आनंद होऊं लागला. श्रीकृष्ण बोबडें बोलूं लागतांचं सर्वांच्या आनंदाला व कौतुकाला सीमाच राहिली नाहीं.

एकदां कंस राजसभेंत म्हणाला, 'दिवसेंदिवस माझा शत्रु वाढत चालला आहे. त्याचा वध करणारा कुणी नाहीं का ?'

हे कंसाचे बोल ऐकून तृणावर्त नांवाचा एक दैत्य उभा राहिला व म्हणाला, 'मी आपल्या शत्रूचा संहार करीनच. मी वायूचें रूप घेऊन आकाशमार्गें गोकुळांत जाऊन आपल्या शत्रूचा निश्चितच वध करीन किंवा त्याला आपल्यासमोर आणून उभा करीन.' हें त्याचें भाषण ऐकून कंसाला समाधान वाटलें. त्यानें त्याचा गौरव करून त्यास गोकुळांत जाण्यास आज्ञा दिली.

तृणावर्त येणार हें श्रीकृष्णानें जाणलें व स्वत:चें अंग जड केलें. यशोदेला श्रीकृष्णाचें वजन झेपेना म्हणून तिनें त्याला कडेवरून खालीं उतरवलें. खालीं उतरतांच श्रीकृष्ण दुडुदुडु धांवत बाहेर गेला. तो बाहेर जातांच मोठा वारा सुटला, वादळ होऊं लागलें, झाडें पडूं लागलीं. कुणी कुणाला दिसेनासें झालें. सर्व गोकुळभर नुसता गोंधळ सुरू झाला. ही संधि साधून तृणावर्तानें श्रीकृष्णाला उचललें व तो त्याला घेऊन आकाशमार्गें जाऊं लागला. परंतु श्रीकृष्णानें स्वत:चें अद्भुत रूप प्रकट करून त्याची मान पकडून ती पिळवटून पार मोडून टाकली. हें होतांच तृणावर्ताचें शरीर मृतप्राण झालें व गोकुळांतील एका अरण्यांत धाडकन् पडलें.

हें संपतांच श्रीकृष्णानें पुन्हां बालरूप घेऊन गोकुळांत प्रवेश केला. त्यानें गोकुळांत प्रवेश करतांच वारा आपोआप थांबला. सर्वजण सावध झाले व आपआपलीं मुलेंबाळें पाहूं लागले. यशोदा-सुद्धां श्रीकृष्णाला पाहूं लागली. तिचें हृदय खालीं-वर होऊं लागलें. ती श्रीकृष्णाला शोधण्यासाठी गोकुळांतील रस्त्यांवर फिरूं लागली. नंद व इतर गवळी आणि गौळणीहि श्रीकृष्णाचा शोध

करूं लागल्या. सर्वजण चिंताग्रस्त झाले. श्रीकृष्ण ला तरी कुठें? गे हा सर्वांपुढे मोठा प्रश्न उभा राहिला. परंतु एवढ्यांत श्रीकृष्ण दुडुदुडु धांवत येतांना त्यांना दिसले यशोदेनें त्याला उचलून हृदयाशीं धरलें व आलिंगन दिलें. पुढें तीं सर्व यशोदेच्या मंदिरांत आली. तो दिवस आनंदानें त्यांनीं घालविला. कंसाला तृणावर्ताच्या मृत्यूची बातमी कळतांच तो जास्तच घाबरला.

पुढे एके दिवशीं यशोदा बाळ श्रीकृष्णाला झोंपवून थोपटीत असतां रामायण सांगूं लागली. जेव्हां रावणानें सीतेला पळवलें असें ती म्हणाली, तेव्हां श्रीकृष्णानें पाळण्यांतून उडी घेऊन श्रीरामांचें रूप धारण केलें व धनुष्याला बाण लावून म्हणाला, 'कुठें आहे तो रावण?' हें पहातांच यशोदा समजली कीं, स्वतःच्या पोटीं असामान्य पुत्र जन्मला आहे.

## ५. यशोदेचें संकष्टी चतुर्थी व्रत

यशोदेनें श्रीकृष्णाला सुधारण्यासाठीं संकष्ट चतुर्थी व्रत करण्याचें ठरवलें. तिनें तें अंमलात आणतांच श्रीकृष्णानें एक महिनाभर कांहींच खोड्या केल्या नाहींत हें पाहून यशोदेला वाटलें कीं, गणरायाच्या कृपेनेंच श्रीकृष्ण असा सुधारूं लागला आहे. चतुर्थीच्या दिवशीं यशोदेनें नैवेद्यासाठीं साखर घालून मोठमोठाले एकवीस मोदक व पुष्कळसे लाडू तयार केले. रात्रीं चंद्रोदयानंतर उपवास सोडायचा होता. तिनें ते सर्व एका ताटांत भरले आणि देव्हाऱ्यांत गणपतीपुढें ठेवले. एवढ्यांत चंद्रोदय झाला आणि श्रीकृष्ण यशोदेला लाडू मागूं लागला. यशोदा म्हणाली, 'अरे बाळा, जरा थांब. अगोदर गणपतीबाप्पाला नैवेद्य दाखवूं दे. मग तुला देईन हं.' असें म्हणून पूजेचें इतर साहित्य आणण्याकरितां यशोदा तेथून गेली. ही संधि साधून श्रीकृष्णानें सर्व मोदक, लाडू वगैरे खाऊन टाकले. यशोदा परत आली अन् पहाते तों लाडू आणि मोदक शिल्लकच नव्हते. तिनें श्रीकृष्णाकडे पाहिलें. श्रीकृष्ण म्हणाला, 'आई, आतां येथें असंख्य उंदीर आले होते. त्यांनीं ते सर्व लाडू व मोदक फस्त केले. एवढेंच नव्हे तर एका मोठ्या उंदरावर गणपति बसून आला

होता. त्यानें तर ह्यांतील सर्वच लाडू खाऊन टाकले व चोरा-सारखा इकडे तिकडे पहात पळून गेला. हें पहातांना मी तर घाबरूनच गेलों.'

यशोदेला हें खरें वाटेना म्हणून ती म्हणाली, 'अगोदर तोंड उघडून दाखव पाहूं!' असें म्हणतांचें श्रीकृष्णानें तोंड उघडून दाखविलें. श्रीकृष्णाच्या मुखांत हजारों देव आणि अनंत ब्रह्मांडें तिला दिसलीं. हें पहातांच ती चकित झाली. याचवेळीं श्रीकृष्णाच्या मुखांतून एक गणपति म्हणाला, 'हे यशोदे, अनंत कोटि ब्रह्मांडनायक तुझ्या उदरीं जन्माला आला आहे. आम्ही फक्त त्याचे अवतार आहोंत. तूं त्यालाच भजत जा.' हें ऐकतांच ती स्वत्व विसरून ब्रह्मानंदांत निमग्न झाली. थोड्याच वेळांत श्रीकृष्णानें तिला म्हटलें, 'ए आई, आतां तरी लाडू देना ग.' यशोदेनें श्रीकृष्णाला उचलून घेतलें व नंतर त्याच्याबरोबर जेवण केलें.

## राधा

गोकुळांत राधेची श्रीकृष्णावर फार भक्ति जडली होती. तिला श्रीकृष्णाचें वेडच लागलें होतें. एकदां श्रीकृष्ण राधेबरोबर नदी-किनारीं बोलत बसला असतां यशोदेनें त्यांना पाहिलें. ती तेथें गेली. तेव्हां श्रीकृष्ण म्हणाला, 'आई, हिनें माझा चेंडू पळवला आहे. तो देत नाहीं म्हणून मीं हिचा पाठलाग केला आहे.' राधा या चोरीच्या आळास कबूल होईना. शेवटीं राधेनें आपलें वस्त्र झटकतांच त्यांतून चेंडू खालीं पडला. राधा शरमिंदी झाली. यशोदा श्रीकृष्णाला घेऊन घरीं गेली. श्रीकृष्णालासुद्धां राधेवांचून करमेनासें झालें. राधेला जळीं, स्थळीं सर्वत्र श्रीकृष्णरूप दिसत होतें.

## ६. यमलार्जुन उद्धार

यशोदेनें श्रीकृष्णाला उखळाला बांधून ठेवलें व ती कामासाठीं घरांत गेली. श्रीकृष्णानें उखळासह समोरच्या अंगणांत प्रवेश केला व दोन वृक्षांचे बुंधे जिथें चिकटले होते तेथें प्रवेश केला व वृक्षावर तें आपटलें. लागलीच ते वृक्ष कोंसळून खालीं पडले. त्यांतून दोन पुरुष निघाले व श्रीकृष्णाला नमस्कार करून आकाश-



मागें निघून गेले. त्याचें असें झालें. ते दोन वृक्ष म्हणजे गतजन्मीं कुबेराचे पुत्र होते. त्यांचीं नांवें नल व कुबेर अशीं होतीं. ते एकदां अत्यंत उन्मत्त झाल्यानें नग्न होऊन स्त्रियांसमवेत जलक्रीडा करूं लागले असतां नारदमुनि तेथें आले. परंतु त्यांनीं नारदाकडे पाहिलें-देखील नाहीं. कारण ते कामान्ध झाले होते. नारदमुनींना राग आला व त्यांनीं शाप दिला, 'तुम्हीं गोकुळांत वृक्षाच्या जन्माला जाल.' ही शापवाणी ऐकतांच ते दोघे घावरले. त्यांनीं त्यांना शरण जाऊन उःशाप मागितला. शेवटीं नारदांनीं 'श्रीकृष्ण तुमचा उद्धार करील' असें सांगितलें. ते दोघे त्या जन्मीं यमल, अर्जुन नांवाचे वृक्ष होऊन नंदाच्या घरांतील वागेंत जन्माला आले. श्रीकृष्णाच्या कृपेनें त्यांचा उद्धार झाला.

यशोदा व नंदानें ते वृक्ष पहातांच मोठें संकट टळल्याचा निःश्वास सोडला. यशोदेनें श्रीकृष्णाला हृदयाशीं कवटाळलें व म्हणाली, 'उगाच मीं माझ्या राजाला उखळाला बांधलें ग.'

## ७. श्रीकृष्णाच्या खोड्या व त्यानें दाखविलेले चमत्कार

एक दिवस श्रीकृष्ण देवघरांत खेळत असतां पूजेमधले नंदाचे

सर्व शाळिग्राम त्यानें स्वतःच्या तोंडांत घालून गिळून टाकले. नंद पूजेस वसला अन् पहातो तों काय तेथील शाळिग्राम बेपत्ता झाले होते. त्यानें श्रीकृष्णाला विचारलें. पण श्रीकृष्ण तयार होईना. तेव्हां नंद म्हणाला, 'माझी पूजा झाल्याशिवाय मी अन्न ग्रहण करणार नाहीं.' हें ऐकतांच श्रीकृष्णानें आपलें तोंड उघडून दाखवलें. त्यानें श्रीकृष्णाच्या तोंडांत असंख्य शाळिग्राम, चंद्र-सूर्य, असंख्य देवता आणि अखिल विश्व पाहिलें. नंद देहभान विसरला. त्याला परमानंद झाला होता. श्रीकृष्णानें त्याला शाळिग्राम दिल्यावर नंदानें कृष्णासह भोजन केलें.

एक दिवस श्रीकृष्ण यशोदेकडे दूध मागूं लागला. यशोदा म्हणाली, 'खंडेरायाला नैवेद्य दाखविल्याशिवाय दूध आज खर्चायचें नाहीं.' तेव्हां श्रीकृष्णानें खंडेराय कुठें आहेत असें विचारलें. यशोदा म्हणाली, 'त्या देव्हाऱ्यांत जाऊन पहा.'

देव्हाऱ्यांत सर्व देव दोरीनें खोवून ठेवलेले श्रीकृष्णाला दिसले. तो परत आला व म्हणाला, 'आई, तूं सर्व देवांची पूजावगैरे करतेस पण त्यांना असें दोरीनें कां वरें बांधून ठेवलें आहेस? मी तुझ्या देवाला मुळींच भीत नाहीं. मी दूध पिणारच.' असें म्हणून कृष्णानें सर्व दूध पिऊन टाकलें.

दुसरा दिवस उजाडला. श्रीकृष्ण यशोदेला म्हणाला, 'आई, माझी मान वांकडी झाली आहे आणि डोळे दुखत आहेत. मला जरा कडेवर घे.' यशोदा म्हणाली, 'बघ, कशी खंडोबारायानें तुला अद्दल घडवली.' ती श्रीकृष्णाला घेऊन देव्हाऱ्यांत गेली व देवाला म्हणाली, 'हे देवा मार्तंडा, खंडेराया, माझ्या बाळावर रागावूं नकोस, कृपा कर!' असें म्हणून तिनें श्रीकृष्णाच्या अंगाला अंगारा लावला. असें होतांच खंडेरायाची दैदिप्यमान मूर्ति प्रगटली आणि यशोदेला म्हणाली, 'परमात्मा तुझ्या पोटीं जन्माला आला आहे. त्याची पूजा कर. त्याची पूजा केलीस तर सर्व देवांना ती पोंचून ते तृप्त होतील.'

एक दिवस श्रीकृष्ण आईजवळ अगोदर जेवायचा हट्ट करूं लागला. यशोदा म्हणाली, 'अरे बाळा, अगोदर देवांची पूजा-

नैवेद्य होऊं दे. मग आपण जेवूं.' श्रीकृष्णानें विचारलें, 'असे देव आहेत तरी किती ?' ती म्हणाली, 'गणेश, भैरव, भगवती, खंडेराय असे कितीक देव आहेत.'

'मग आई, या सर्व देवांचा जो देव तूं त्याचीच पूजा कर.'

'पण आम्हांला तो कसा दिसावा ?' यशोदा म्हणाली.



हें ऐकतांच श्रीकृष्णानें लगेच शंख, चक्र, गदा हातांत असलेलें चतुर्भुज घनःश्यामरूप तिला दाखवलें. तें पहातांच तिनें त्याला नमस्कार केला. लागलीच श्रीकृष्णानें पुन्हां आपलें गोजिरवाणें रूप धारण केलें. यशोदा त्या कृष्णाच्या सुंदरशा रूपाच्या दर्शनानें धन्य झाली. आपल्या पोटीं परमेश्वरच जन्मला याची तिला आतां थोडीफार खात्रीहि पटूं लागली.

एक दिवस श्रीकृष्ण यशोदेला स्फुदत म्हणाला, 'आई, बलरामदादा म्हणतो की, तुझे आईवडील गोरेपान आहेत, पण तूंच श्यामल आहेस. याचाच अर्थ तुला त्यांनीं कोंडा देऊन विकत घेतला आहे.' हें ऐकन यशोदा म्हणाली, 'चल वेडा कुठला ! अरे तो तुझी चेष्टा करतो आहे. असे का कुणी कोंडा देऊन मूल देतात ? तो बलराम

तुला कांहींतरी खोटें सांगत आहे.'

एक दिवस श्रीकृष्णानें एका गौळणीच्या घरांत प्रवेश केला. त्यावेळीं ती स्नानाला गेली होती. त्यानें ही संधि साधून सर्व गाईंना मोकळें सोडून दिलें व तेथें बैल आणून बांधले. गौळण स्नान करून परत आली व दुधाची धार काढण्यासाठीं गोठ्यांत गेली. तिनें धार काढण्यासाठीं हात लावला, तों तेथें तिला गाय नसून बैल असल्याचें आढळलें.

सर्व ठिकाणीं असेंच झालें. ही सर्व खोडी कृष्णाचीच हें तिनें ओळखलें व ती यशोदेकडे कागाळी घेऊन गेली. यशोदेला राग आला व ती वेताची छडी घेऊन श्रीकृष्णाला मारायला धांवली. परंतु श्रीकृष्णानें तेथून पलायन केलें. वाटेंत नंद दिसला. त्यानें त्याचें बोट धरून घरांत प्रवेश केला.

यशोदेनें घडलेला सर्व प्रकार सांगतांच नंद हंसला.

एकदां कांहीं गौळणी श्रीकृष्णासह नौकाविहार करीत असतां जुन्या नौकेला भोक पडलें असल्यानें ती बुडूं लागली. शेवटीं सर्व-जणीं अगदीं पाण्यांत बुडायच्या बेतांत असतां त्यांनीं श्रीकृष्णानें वांचवावें म्हणून त्याचा धांवा सुरू केला.

त्या म्हणाल्या, 'हे सांवळे कान्हाई, परमेश्वरा, तुझें असेंच सांवळें रूप जन्मोजन्मीं आम्हांला दर्शन देत राहूं दे. आमच्या प्रत्येक जन्मांत तूं आमचा सवंगडी हो.' हें गौळणींचें प्रेम पाहून श्रीकृष्णानें पाऊस थांबवला. आकाश स्वच्छ झालें व नौका पहिली होती तशीच तीराला लागली.

## ८. ब्रह्मदेवाचें गर्वहरण

श्रीकृष्ण आतां गाईवासरें घेऊन वनांत चरावयास जाऊं लागला. एकदां पेंद्यानें पैज मारून यमुनेच्या पाण्यांत हमामा खेळ खेळून स्वतःचें श्रीकृष्णाकडून कौतुक करवून घेतलें. परंतु त्याला श्रीकृष्णानेंच यमुनेला शांत केलें तें कळलें नाहीं. पुढें एक दिवस ब्रह्मदेवांनीं श्रीकृष्ण हा खरोखरच परमात्मा आहे का हें पहाण्या-साठीं त्याचीं गुरेंवासरें वगैरे लपवलीं. श्रीकृष्णानें हें अंतर्ज्ञानानें

ओळखलें. त्यानें सर्व गुरेंवासरें, बाळगोपाळ स्वतःच्या सामर्थ्यानें व मायेनें निर्माण केले. अगदीं हुबेहुब...असें एक वर्ष चाललें. पण कुणाला या कृष्णाच्या कृतीचा थोडादेखील संशय आला नाहीं.

एका वर्षानंतर ब्रह्मदेव काय घडलें तें पहायला खालीं आले. तों सर्व कांहीं ठाकठीक होतें. त्यांना स्वतःच्या कृतीची लाज वाटली. त्यांनीं श्रीकृष्णाचे पाय धरले व म्हणाले, 'हे जगदुद्धारा, जगद्गुरु, परमेश्वरा. पुराणपुरुषा, आदिनारायणा, हे परममंगलधामा, भक्तरक्षका, माझ्या घडलेल्या अपराधाबद्दल क्षमा करा...'

श्रीकृष्णानें ब्रह्मदेवांना सांगितलें, 'आपण देहबुद्धीचा अभिमान न धरतां स्वरूपाच्या विचारांत नेहमीं निमग्न व्हा. यांतच हित आहे.'

ब्रह्मदेवांनीं श्रीकृष्णाला प्रदक्षिणा घातली व पाहिलें तों भोंवतीं त्यांना सर्वच श्रीकृष्णरूप दिसूं लागलें. ते धन्य झाले. शेवटीं श्रीकृष्णाची आज्ञा घेऊन ते स्वतःच्या स्थानाकडे परतले.

## ९ कालियामर्दन

चैत्रवैशाखाचे दिवस असल्यामुळें हवेंत उष्णता फार होती. यमुनेच्या डोहांत पाणी पिण्यासाठीं सर्व गोप व गाईवासरें धांवलीं, तों तें पाणी पितांच मृत झालीं. श्रीकृष्णाला हें कळतांच तो तेथें गेला. त्यानें जाणलें कीं, त्यांत रहात असलेला कालिया नाग तें पाणी विषमय करून टाकत आहे. त्यानें स्वतःच्या सामर्थ्यानें सर्व गोप व गाईवासरें यांना जिवंत केलें. ह्या यमुनेच्या डोहावरून जाणारे पक्षीसुद्धां त्या उष्णतेच्या लाटेनें मरण पावत होते.

हा कालिया नाग यमुनेच्या डोहांत येऊन राहूं लागला याचें कारण असें होतें कीं, एकदां सर्व सर्प गरुडाला शरण गेले व म्हणाले, 'हे पक्षीराज गरुडा, तूं नेहमींच आमचा संहार करतोस. तरी कृपा करून तें जरा थांबव.'

त्यांची प्रार्थना ऐकून गरुड म्हणाला, 'प्रतिवर्षीं तुम्ही पंचमीला माझी पूजा करीत जा म्हणजे मी तुमचा संहार करणार नाहीं.' त्याप्रमाणें सारांनीं तसें सुरू केलें परंतु पुढें ते गरुडाची पूजा

करीनासे झाले. परंतु कालियाला स्वत:च्या सामर्थ्याचा गर्व झाला व गरुड आतां आपल्याला ठार मारणार या भीतीनें तो यमुनेच्या डोहांत लपून बसला. कारण त्या डोहाला स्पर्श करूं नये असा गरुडाला शाप असल्याचें त्याला समजलें होतें.


गरुडाला शाप मिळण्याचें कारणहि तसेंच होतें. गरुड नेहमीं त्या डोहाकडे येऊन तेथील मासे भक्षण करीत असे. शेवटीं सर्व मासे सौरभमुनीस शरण गेले व त्यांनीं गरुडाचें कृत्य त्यांना सांगितलें व कांहींतरी कृपा करावी अशी विनंति केली. सौरभमुनि तेथें तप करायला येत असत. ती त्या मत्स्यांची केंविलवाणी विनवणी ऐकून त्यांनीं त्यांना अभय दिलें व म्हणाले, 'आजपासून गरुडानें जर या यमुनेच्या पाण्याला स्पर्श केला तर तो तत्काळ मरून जाईल.' ही गोष्ट कळतांच गरुड तेथें येईनासा झाला व मासेहि प्रमानें राहूं लागले.

त्या कालियानें निर्माण केलेल्या विषानें त्या यमुनेच्या डोहाजवळील सर्व वृक्ष व वनस्पति जळून गेल्या होत्या. फक्त कदंबवृक्ष उभा होता. कारण त्यावर पूर्वीं अमृताचा घट घेऊन जात असतां गरुड कांहीं काळ बसला होता.

श्रीकृष्णानें सर्व प्रकार ओळखून यमुनेच्या डोहांत उडी टाकली. कालिया नागानें मोठा फुत्कार करून त्याच्यावर हल्ला केला व दंश करून त्याचें सर्व अंग वेढलें. हें होतांच श्रीकृष्णानें स्वत:चें शरीर फुगवण्यास सुरुवात केली.

ही सर्व झटापट गोप, गोपी, नंद, यशोदा तीरावरून पहात होत्या. यशोदा घाबरून गेली होती. परंतु बलरामानें तिला सांगितलें, श्रीकृष्ण प्रत्यक्ष आदिनारायण आहेत काळजी करूं नका.

पुढें कालिया आतां स्वत:चें शरीर तुटूं लागतांच विव्हळूं लागला. त्याच्या वायका श्रीकृष्णाला विनवूं लागल्या! 'आम्हांला वज्रचुडा दान दे. हे परमेश्वरा, पतीच्या अपराधाची आम्ही क्षमा मागतों.' हें सर्व देवसुद्धां आकाशांतून पहात होते व श्रीकृष्णाचा जयजयकार करीत होते. कालियानें आतां स्वत:चा कांहीं निभाव लागणार नाहीं हें जाणलें व मानवरूप धारण करून तो



श्रीकृष्णाला शरण गेला. श्रीकृष्णानें त्याला तेथून जाऊन महासमुद्रांत रहाण्याची आज्ञा दिली, तसेंच श्रीकृष्ण म्हणाला, 'माझी पदमुद्रा तुझ्या शिरावर आहे. त्यामुळें तुला गरुड मारणार नाहीं.' श्रीकृष्णाची आज्ञा ऐकून त्याला नमस्कार करून त्याची पूजा करून सहकुटुंब सहपरिवारें तो महासागरांत निघून गेला. सायंकाळ झाली तेव्हां तेथेंच रहावयाचें असें सर्वांनीं ठरवलें. परंतु रात्रीं एकाएकीं अग्नीनें मोठें रूप धारण करून तेथें महाकल्लोळ माजवला. श्रीकृष्णानें लागलीच सर्वांना डोळे मिटावयास सांगितलें व त्यांनीं तसें करतांच त्या महाभयंकर अशा अग्नीचें भक्षण केलें व त्या सर्वांचे जीव वांचवले. पुढें दुसऱ्या दिवशीं सकाळ होतांच सर्वजण गोकुळाला परतले.

## १०. गोवर्धन पर्वताची पूजा आणि व्योमासुर, मयासुर, यांचा संहार तसेंच दैत्यांचा पराभव

एकदां श्रीकृष्ण-बलराम व गोप वनांत गाई चारावयास गेले असतां तेथें गोपीहि आल्या व म्हणाल्या, 'आम्हांला असें वाटतें

कीं, अन्नपाणी देणाऱ्या इंद्राची आपण पूजा करावी. कारण तो पाऊस देतो व शेतें पिकवितो.' हें ऐकतांच श्रीकृष्ण म्हणाला, 'छे ! इंद्र कांहींच करीत नाहीं. उलट प्रत्येक प्राणीमात्र स्वत:च्या कर्माप्रमाणें जीवन कंठीत असतो. आपल्या गोवर्धन पर्वतावर गाई-वासरें चरतात व खरें म्हणजे तोच आपला अन्नदाता आहे. तरी मला वाटतें, आपण त्याची पूजा करावी.' श्रीकृष्णाच्या बोलण्या-प्रमाणें गोप-गोपी, नंद, यशोदा यांनीं पूजेची सामुग्री तयार केली व ते गोवर्धन पर्वताकडे जाण्यास निघाले. सर्वांत पुढें वाजंत्री, त्याच्या मागें गाई-वासरें, मागें श्रीकृष्ण, नंद, यशोदा, गोप-गोपी वगैरे चालूं लागले. यशोदा व गौळणी बसलेल्या हजारों गाड्या गोवर्धन पर्वताकडे चालूं लागल्या. त्यानीं यथासांग गोवर्धनाची पूजा केली व नैवेद्य दाखविला. त्या नैवेद्याचें गोवर्धन पर्वत पुरु-षाचें विशाल रूप घेऊन भक्षण करूं लागला. हें पहातांच श्रीकृष्ण म्हणाला, 'पहा कसा गोवर्धन जेवतो आहे. तुम्ही यज्ञ वगैरे करून उगाच अन्न फुकट घालवीत असतां.'

त्यानंतर सर्वांनीं गाईची पूजा करून नंतर भोजन वगरे उर-कलें. शेवटीं सर्वजण गोवर्धन पर्वतास प्रदक्षिणा घालून गोकुळास जाण्यास निघाले परंतु इंद्राला स्वत:ची पूजा न झाल्यामुळें राग आला व त्यानें रागानें त्या गोवर्धन पर्वत व गोकुळावर जोराची पर्जन्यवृष्टि करण्याची मेघांना आज्ञा दिली. आज्ञा होतांच तेथें मुसळधार पाऊस, विजांचा कडकडाट सुरू झाला. त्या जोराच्या पावसाच्या माऱ्यानें समुद्रांत ढेकूळ पडावें तशी गोकुळाची स्थिति झाली. सर्वजण मोठ्यांदां आक्रंदूं लागले. गाईंच्या पोटाखालीं वासरें आसरा घेऊं लागलीं. यशोदेनें श्रीकृष्णाला आपल्या पदरा-खालीं झांकलें. ती व इतर सर्व परमेश्वराची प्रार्थना करूं लागले. 'हे परमेश्वरा, जगदुद्धारा प्रभो, त्या इंद्रानें मांडलेल्या या प्रचंड प्रलयकाळीं तूंच आतां आमचें रक्षण कर.' श्रीकृष्णानें लगेच धांवत जाऊन आपल्या करंगळीनें तो पर्वत उचलला व त्याखालीं सर्वांना येण्यास त्यानें सांगितलें. त्या सर्वांनीं पर्वत वर उचलून धरायला मदत केली. त्यांना वाटलें ते सर्वजण पर्वत उचलून

घरीत असून श्रीकृष्ण फक्त आपली करंगळीच टेकून उभा आहे. परंतु श्रीकृष्णानें करंगळी जराशी खालीं आणतांच कडाड् कड असा आवाज झाला. गोप घावरले. त्यांनीं श्रीकृष्णाची क्षमा मागितली.

असे सात दिवस झाले. इंद्राला वाटलें सर्वजण मेले. आतां आपण काय झालें तें पहावें. त्यानें पाऊस वगैरे थांबविला आणि पहातो तों काय, सर्वजण गोवर्धनाबाहेर येत आहेत व गोकुळाकडे चालण्याच्या तयारींत आहेत. इंद्राला त्याच्या कृतीची लाज वाटली व त्यानें श्रीकृष्णाची क्षमा मागितली. श्रीकृष्ण इंद्राला म्हणाला, 'हे अमरेश्वरा, तूं स्वतःच्याविषयीं मनांत गर्व धरूं नकोस. तूं गर्व धरलास म्हणून मला हें सर्व करणें प्राप्त झालें. तरी आतां गरिबांचें रक्षण कर आणि दुष्टांचा संहार कर.' श्रीकृष्णाचें तें वचन ऐकून इंद्रानें श्रीकृष्णाची स्तुति केली व अभयवचन घेऊन त्याला प्रदक्षिणा घालून तो स्वस्थानीं निघून गेला.

कंसानें मयासुराचा मुलगा व्योमासुर याला बोलावणें पाठवलें व तो येतांच त्यानें गोकुळांत जाऊन श्रीकृष्णाचा वध करण्याची त्याला आज्ञा दिली. व्योमासुरानें गोपाळाचें रूप धारण केलें व तो वृंदावनांत गेला. तो त्या खेळगड्यांत मिसळलासुद्धां. नंतर तो म्हणाला, 'कृष्णा, आपण खेळ खेळूं. आपण अर्धे अर्धे गडी वांटून वाघमेंढीचा खेळ खेळूं.' सर्वांनीं त्याला होकार दिला.

असें होतांच व्योमासुरानें एकेक गोप व गाईंना उचलून नेलें व एका विवरांत संपूर्णपणें कोंडून ठेवलें. श्रीकृष्ण आजूबाजूला पाहूं लागला, परंतु कुणीच दिसेना. शेवटीं त्यानें मुरली वाजवली. ती ऐकून गोप त्याचा धांवा करूं लागले. श्रीकृष्णानें लागलीच आपल्या मुखावाटें चक्र काढून पर्वत फोडला व सर्व गोपाळ आणि गाईंची मुक्तता केली. व्योमासुर संतापला आणि अति विशाल मुख पसरून श्रीकृष्णाकडे धांवला. श्रीकृष्णानें त्या व्योमासुराचा कंठनाळ छेदून त्याचें शिर आकाशांत उडवलें. हा प्रकार पाहून सर्व गोपाळ थक्क झाले. शेवटीं सर्वजण गोकुळांत परत आले.

व्योमासुराच्या वधाची वातमी समजतांच कंस घावरला व

त्यानें श्रीकृष्णाच्या वधाचा विचार केला. त्यानें कृष्ण व बलराम यांना पकडून आणण्यासाठीं अकरा हजार दैत्यांना आज्ञा दिली. ते गोकुळांत गेले. त्यावेळीं यमुनातीरीं गोपाळ नेहमींप्रमाणें गाई–वासरांना चरायला सोडून खेळत होते. दैत्यांनीं त्यांना वेढा घातला व विचारलें, 'अरे, ते श्रीकृष्ण–बलराम कुठें आहेत?' गोपाळ श्रीकृष्ण–बलराम यांना लपवूं लागले. परंतु श्रीकृष्णाला तें पटलें नाहीं. श्रीकृष्ण न घाबरतां म्हणाले, 'कोण तुम्ही? तुम्हांला येथें कुणी पाठवलें?'



दैत्य म्हणाले, 'कंस राजानें तुम्हांला धरून आणण्यासाठीं आम्हांला पाठवलें आहे.' हें ऐकतांच श्रीकृष्ण हंसून म्हणाले, तुमचा कंस राजा महामूर्खच दिसतो. दोघांना नेण्यासाठीं एवढे-जण कशाला? आम्हांला तुमच्यापैकीं दोघेजण कडेवर घेऊन सहज नेऊं शकतील. तरी तुम्ही दोघेजण येथें रहा व बाकीचे परत जा. आम्ही जेवण करतों आणि त्या दोघांबरोबर येतों.' हें भाषण त्या दैत्यांना पटलें व त्यांनीं कंसाला मूर्खांत काढलें. दोघांना तेथें ठेवून बाकीचे मथुरेकडे परतले.

श्रीकृष्ण व बलराम यांनीं त्या दैत्यांची चांगलीच फजिती करायची असें ठरवलें. याच वेळीं ते दैत्य 'लौकर चला' म्हणूं लागले. हें ऐकतांच बलराम व इतरांनीं त्यांना बेदम मारलें. त्या त्यांच्या मारण्यानें ते दैत्य म्हणाले, 'आमच्यावर दया करा. आम्ही कधींहि गोकुळांत परत येणार नाहीं. आम्हांला जीवदान द्या.'

हें एकून श्रीकृष्ण म्हणाला, 'तुम्हांला जीवदान देतों. पण कसाला सांगा कीं, आम्हीं तुम्हांस जीवदान दिलें.'

'हो' असें म्हणून जीव घेऊन ते दोन दैत्य तेथून पळाले. वाटेंत त्यांना मघांशी अजून मथुरेला न पोंचलेले दैत्य भेटले. त्या दोघांना रिकामें पाहून त्यांना विचारतांच ते म्हणाले, 'काय सांगावें ? अहो, त्यांनीं आम्हांला एवढें उत्तम जेवण घातलें आहे कीं, आतां पोटाला तडस लागली आहे. अजून आग्रह करीत होते. परंतु आम्ही पळून आलों. तरी तुम्हीहि जा व जेवण करा आणि त्यानंतर त्यांना धरून आणा.'

दैत्यांच्या तोंडाला पाणी सुटलें. दैत्य तेथें जातांच सर्व गोप घाबरले परंतु श्रीकृष्णानें त्यांना घाबरूं नका असें सांगितलें. लागलीच श्रीकृष्णानें आकाशाकडे पहातांच अकरा हजार गंधर्व त्या ठिकाणीं आकाशांतून उतरले. त्याचा मुख्य चित्रसेन होता तो कृष्णाला वंदन करून म्हणाला, 'हे प्रभो, काय आज्ञा आहे ?'

हें ऐकताच कृष्णानें त्याला त्या दैत्यांस भरपूर भोजन देण्यास आज्ञा केली. बस्स ! श्रीकृष्णाची आज्ञा होतांच ते सर्व गंधर्व त्या दैत्यांवर तुटून पडले आणि त्यांनीं त्या सर्व दैत्यांची धूळधाण उडवून दिली. जे वाचले ते मथुरेला कसेबसे जीव घेऊन पोंचले व त्यांनीं घडलेला वृत्तांत कंसाला सांगितला. कंस भयभीत झाला.

## ११ देवांतक, पितृद्रोही व असुरासुर यांचा वध

कंसाची भीति दिवसेंदिवस वाढतच चालली होती. त्यानें देवांतक व पितृद्रोही यांचा गौरव करून त्यांना श्रीकृष्ण आणि बलरामाचा वध करण्यासाठीं पाठवलें ते दोघे वाघाचें रूप घेऊन बसले. गोपाळांनीं तें पहातांच गाई घराकडे वळवल्या आणि नंदाला

ही बातमी सांगितली. नंदानें श्रीकृष्ण व बलराम यांना लांब कुठें न जाऊं देण्याविषयीं यशोदेला बजावलें. परतु एक दिवस श्रीकृष्ण व बलराम थोडेंसें खेळून येतो म्हणून बाहेर पडले व ते वृंदावनांत गेले. त्यांना पहातांच देवांतक व पितृद्रोही यांनीं भयानक आरोळी ठोकून व विक्राळ तोंड पसरून बलराम व श्रीकृष्णावर चाल केली. श्रीकृष्ण–बलरामांनीं स्वतःच्या मुखांतून गदा काढून त्यांचा क्षणार्धांत संपूर्ण चुरा केला. ते गतप्राण होतांच त्यांनीं त्यांचीं कातडीं हातांत घेतलीं व ते घरीं परतले. त्यांना येतांना पहातांच यशोदेनें धांवत जाऊन कृष्णाला जवळ घेतलें. नंदानें ती कातडी कोणी दिलीं असें विचारतांच श्रीकृष्ण म्हणाला, 'मरून पडलेल्या वाघाचीं हीं कातडीं आहेत. तीं तुम्हांला आसनासाठीं आम्हीं आणलीं आहेत.' नंदानें काय घडलें याचा तर्क केला.

देवांतक व पितृद्रोही यांच्या मृत्यूची वार्ता कळतांच कंस जास्तच घाबरला. परंतु जलासुर म्हणाला, 'महाराज, मी आतां त्या दोघांना शिल्लक ठेवत नाहीं, तरी मला आज्ञा व्हावी.'

कंसानें त्याचा गौरव केला. जलासुर यमुनेच्या डोहांत लपून बसला. श्रीकृष्णानें तें जाणलें व जलांत शिरून त्याचा वध करून त्याचें प्रेत नागपाशांनीं कांठावर आणून ठेवलें व तो म्हणाला, 'हें पहा, सवंगड्यांनो, आम्ही आतां पुढें जातों. तुम्हीं हें धूड ओढीत गोकुळांत घेऊन या याचा वध तुम्हींच केला असें सांगा.' बलराम श्रीकृष्ण गोकुळांत परतले. थोड्याच वेळांत त्या गोपाळांनी तें जलासुराचें प्रेत ओढीत गोकुळांत आणलें व स्वतः त्याचा वध केल्याची फुशारकी मारली. तसेंच श्रीकृष्ण व बलराम भित्रे असल्याचें त्यांनीं सांगितलें. जलासुराचा वध झालेला कळतांच कंसानें त्याचें प्रेत मथुरेंत आणवलें व तो पुन्हां चिंता करूं लागला. कंस अतिशय घाबरला होता.

कंसानें भरसभेंत स्वतःच्या शत्रूला कुणीच मारूं शकत नाहीं याबद्दल खेद व्यक्त करतांच असुरासुरानें तें काम करण्याची प्रतिज्ञा केली व तो वायुवेगानें यमुनेच्या तीरावर येऊन बसला. त्याला पहातांच सर्व गोप घाबरले. परंतु श्रीकृष्णानें त्यांना घाबरूं

नका असें सांगितलें. श्रीकृष्णानें डोळे मिटून मारुतीचें स्मरण केलें. त्यावेळीं मारुति सेतुबंधावर समाधिस्थ बसला होता. त्याच्या कानीं प्रभूची हांक पडली. लागलीच त्यानें उड्डाण केलें व तो श्रीकृष्ण व बलराम यांच्या समोर उभा राहिला. परंतु त्यावेळीं श्रीकृष्णानें रामाचें आणि बलरामानें लक्ष्मणाचें रूप घेतलें होतें.

मारुतीनें नमस्कार करून विचारलें, 'स्वामींनीं मला कां बोलावलें?' तेव्हां श्रीकृष्णानें त्याला हृदयाशीं धरलें व म्हणाला, 'हे मारुतिराया, मला तुझ्याशिवाय कोणीच प्रिय नाहीं.' हें ऐकतांच मारुतीला आनंद झाला. श्रीकृष्णानें त्याला असुरासुर दाखवला व त्याचा वध करण्याची आज्ञा केली. मारुतीनें असुरासुरावर आकाशांत उंच उडून झेंप घेतली व त्याला गरगरां फिरवून पृथ्वीवर आपटून ठार केलें. तो कृष्णाजवळ आला व म्हणाला, 'स्वामींनीं याठिकाणीं कां बरें आगमन केलें आहे?' श्रीकृष्ण म्हणाला, 'आम्ही सध्यां कृष्णावतारांत आहोंत. मी श्रीकृष्ण झालों आहें आणि लक्ष्मण बलराम झाला आहे.' हें ऐकून मारुतीनें कृष्णावतार पहायाची इच्छा दाखविली. श्रीकृष्णानें व बलरामानें पुन्हां आपलीं पहिलीं रूपें दाखविलीं. मारुति संतुष्ट झाला व त्यांना नमस्कार करून स्वस्थानीं परतला.

## १२ अघासुर, धेनुकासुर, केशी, बकासुर वगैरेंचा वध

कंसानें अघासुर नांवाचा दैत्य कृष्णाच्या वधासाठीं पाठवला. तो अजगराचें रूप धारण करून गोकुळांतील वनांत रस्त्यावर निजला. त्यानें स्वतःचें तोंड उघडें करून तें दरीसारखें पसरलें. खेळतां खेळतां गोपाळांनीं दरीच आहे असें समजून गाईंसह तेथें प्रवेश केला. गोपाळांच्यावरोबर श्रीकृष्णानेंहि प्रवेश केला. सर्व आंत जातांच अजगरानें आपलें तोंड मिटलें. सर्वांचा जीव कासावीस होऊं लागला. ते कृष्णाचा धांवा करूं लागले. श्रीकृष्णानें लागलीच स्वतःचें शरीर फुगवीत तें अघासुरापेक्षां उंच केलें व अघासुराला उभा चिरून सर्वांची सुटका केली.

अघासुराच्या वधाची बातमी कळतांच कंसानें धेनुकासुर

नांवाचा दैत्य पाठवला. तो गोकुळांत आला व बैलाचें रूप धारण करून बसला. नित्याप्रमाणें सर्व गोपाल गाई-वासरांना घेऊन वनांत गेले. तेथें ताडांचें भयंकर रान होतें. धेनुकासुर मोठ्या गर्जना करूं लागला. श्रीकृष्णानें जवळ बोलावतांच त्यानें आपलें शिंग उभारून श्रीकृष्णावर झेंप घेतली. श्रीकृष्णानें त्याचीं शिंगें पकडून त्याला गरगरां फिरवून जमिनीवर आपटून ठार केलें.



नंतर केशी नांवाचा दैत्य घोड्याचें रूप घेऊन गोकुळांत आला. त्याचें तें रूप पाहून सर्वांनीं आपापल्या घरांचीं दारें लावून घेतलीं. सर्वत्र कोलाहल माजला. परंतु श्रीकृष्णानें त्याच्यावर चाल करून त्याच्या पायाला धरून गरगरां फिरवून जमिनीवर दूर फेंकलें. परंतु तो उठून परत श्रीकृष्णावर धांवून आला. श्रीकृष्णानें त्याचें नाक पिळलें व जीभ बाहेर ओढून काढली व पिळली. असें होतांच केशी मरून पडला.

केशीच्या मृत्यूनें कंसाला फार दुःख झालें. पुढें प्रलंब नांवाचा दैत्य बैलाचें रूप धारण करून आला. त्यानें श्रीकृष्णावर हल्ला करतांच श्रीकृष्णानें जमिनीवर आपटून त्याला ठार केलें.

पुढें शंख आणि चूड नांवाचे दैत्य गाईंचीं रूपें धारण करून आले व हंबरडे फोडूं लागले. हें ऐकतांच श्रीकृष्ण बलरामाला म्हणाला, 'दादा, गाईंची हाक ऐकूं येत आहे. बहुतेक वाघ त्यांना ओढून नेत असावा.' असें म्हणून त्यानें एक वृक्ष उपटला व त्या आवाजाच्या दिशेनें धांव घेतली. बलरामहि धांवूं लागला. त्या दोघांनीं बलराम–श्रीकृष्णाला पहातांच आपलीं उग्र रूपें दाखविलीं. ते पळूं लागतांच त्या दोघांनीं त्यांचा पाठलाग सुरू केला. त्या दैत्यांनीं गाईंचीं रूपें टाकून वाघांचीं रूपें धारण केलीं व त्या दोघांपुढें उभे राहिले. हें पहातांच श्रीकृष्ण–बलरामांनीं वृक्षांचा त्यांच्या डोक्यावर प्रहार करून त्यांना ठार केलें.

एकदां एकादशीच्या दिवशीं नंद यमुनेच्या तीरावर स्नानास गेला असतां वरुणाच्या दूतांनीं त्याला पकडून पाताळांत नेलें. नंद घरीं परत आला नाहीं तेव्हां सर्व घाबरले. शेवटीं श्रीकृष्णानें त्यांना धीर दिला व यमुनेंत प्रवेश करून वरुणाला पकडलें. वरुण घाबरला व त्यानें श्रीकृष्णाचे पाय धरून क्षमा मागितली. श्रीकृष्ण म्हणाला, 'वरुणा, मीपणा टाकून देऊन नीटपणें वाग! अभिमान बाळगूं नकोस.'

वरुणानें पुन्हां श्रीकृष्णाला वंदन केलें व नंदाला आणून स्वतः श्रीकृष्णाच्या स्वाधीन केलें. श्रीकृष्ण व नंद सुखरूप परत आलेले पाहून सर्वांना आनंद झाला.

एके दिवशीं देवीच्या यात्रेसाठीं नंद व सर्व गवळी देवीच्या वनांत गेले सर्वत्र गवळगोहि दहीं, दूध, तूप व लोणी यांचे हंडे भरून निघाल्या. वाजतगाजत सर्व मंडळी देवीच्या वनांत पोंचली. आंबा, कदंब, औदुंबर, नारळी, पोफळी, चंदन वगैरे झाडांनीं वन सुशोभित दिसत होतें. तेथ सव नाना प्रकारचीं रंगीबेरंगी फुलझाडें होतीं. वनाच्या मध्यावर तलाव असून त्यांत कमळें उमललीं होतीं. लोकांनीं गाड्यावरील सामान उतरवलें व देवीची पूजा केली. त्या रात्रीं सर्व मंडळी वनांतच झोंपली.

रात्रीं एका भयंकर अजगरानें नंदाला गळ्यापर्यंत गिळलें. नंद 'धांवा, धांवा!' म्हणून ओरडला. कृष्णाच्या कानीं ही हांक

पडतांच त्यानें त्या अजगराला लाथ मारली व हातांत शस्त्र घेऊन, त्याला उभा चिरून नंदाची सुटका केली. त्याला चिरतांच एक दिव्य पुरुष त्यांतून बाहेर पडला व कृष्णापुढें उभा राहून म्हणाला, 'हे परमेश्वरा, मी विद्याधर गंधर्व आहें. माझें नाव सुदर्शन. मी विषयांध होऊन स्त्रियांशीं जलक्रीडा करीत असतां जवळून जाणाऱ्या ऋषि–मुनींना मीं नमस्कार केला नाहीं. मी कामांध झालों होतों. त्यांनीं रागावून मला शाप दिला, 'हे दुष्ट उन्मत्ता, तूं वनांत साप होऊन पडशील.' मी बावरलों व त्यांची प्रार्थना करून उःशाप मागितला. त्यांना साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां ते म्हणाले, 'देवीच्या वनांत जेव्हां श्रीकृष्ण येईल तेव्हां त्याच्या पदस्पर्शानें तुझा उद्धार होईल.' मला त्याचा आज प्रत्यय आला. परमेश्वरा, मी धन्य झालों.' असें म्हणून त्यानें श्रीकृष्णाचे पाय धरले व तो स्वस्थानीं निघून गेला.

पुढे बकासुर नांवाच्या दैत्यानें बगळ्याचें रूप धारण करून श्रीकृष्णाला गिळण्याचा प्रयत्न केला, परंतु कृष्णाला गिळतांच घशांत दाह झाला आणि त्यानें त्याला ओकून बाहेर टाकलें. लाग-लीच श्रीकृष्णानें त्याची चोंच धरून त्याला उभा चिरून टाकला.

पुढें अरिष्टासुर भयंकर शक्तीचें रूप घेऊन श्रीकृष्णावर धांवला. तेव्हांच त्यानें आपली योगमाया प्रगट करून त्या दैत्या-वर सोडतांच तिनें त्याला गिळून टाकलें. पुढें कागासुरास वीर-भद्राच्या हातून मारलें. पुढें श्रीकृष्णानें कंसानें पाठविलेल्या खरा-सुर, खगासुर व विठ्ठासुर या दैत्यांचा संहार केला.

या सर्व दैत्यांच्या वधामुळें कंस घाबरला व त्यानें स्वतःची नवी युक्ति योजून श्रीकृष्ण–बलरामांना पकडण्याचा प्रयत्न केला. त्यानें कांहीं घागरी, कोहाळे व वाळू गोकुळास पाठविलीं व निरोप दिला कीं, 'कोहाळे सगळेच्या सगळेच घागरींत भरून व वाळूचे हातानें दोरखंड वळून पाठवा आणि हें जर गोकुळांतील लोकांना जमलें नाहीं तर त्यांनीं श्रीकृष्ण–बलरामाला कंसाकडे पाठवावें आणि पाठविलें नाहीं तर त्यांचा संहार होईल.' या विचित्र कोड्यानें सर्व गोकुळवासी चिंतेंत पडले. परंतु श्रीकृष्णानें आपल्या मायेच्या

प्रभावानें ते कोहाळे अगोदर लहान केले व घागरींत घातले आणि नंतर आंत त्यांचा आकार पहिल्यासारखा वाढवला. तसेंच त्यानें वाळूचे दोर वळले व घागरीभोंवतीं गुंडाळले. त्यानें त्या दूतांना ते घेऊन जाण्यास सांगितलें. तो त्यांना म्हणाला, ' हें कंस महाराजांना द्या व कोड्याचें उत्तर यांत आहे असें सांगा. ' दूत हें सर्व घेऊन जातांच कंसाच्या हृदयाचा थरकांप उडाला.

## १३ अक्रूर गोकुळांत जातो, श्रीकृष्ण मथुरेंत जातो

कंस आतां चिंतेनें क्षीण होत चालला होता. त्यानें त्याच्या प्रधानाच्या सांगण्यावरून अक्रूराला बोलावून घेतलें व तो म्हणाला, " तुम्ही वृंदावनास जाऊन बलराम व श्रीकृष्ण यांना घेऊन या. नंदादि गवळ्यांना सांगा कीं, मथुरेस कंसमहाराजांनीं धनुर्याग मांडला आहे. तो पाहून मग गोकुळास परत जा. माझा स्वतःचा रथ घेऊन जा व त्या दोघांना घेऊन उद्यां सकाळीं येथें या. '

अक्रूरानें रथ जुंपला व तो गोकुळांत गेला. वेळ सायंकाळची होती. श्रीकृष्ण व बलराम नुकतेच घरीं परतले होते. अक्रूरानें श्रीकृष्णाला पहातांच दंडवत घातला. परंतु श्रीकृष्णानें त्याला उचलून आलिंगन दिलें. अक्रूरानें बलरामालाहि आलिंगन दिलें.

अक्रूरानें स्वतःच्या येण्याचें प्रयोजन नंदाला सांगितलें. यशोदेनें श्रीकृष्णाची काळजी घेण्यास अक्रूराला सांगितलें. श्रीकृष्ण मथुरेला जाणार हें ऐकतांच गोकुळवासी दुःखी झाले. त्यांना वाटलें, श्रीकृष्ण आतां परत येणारच नाहीं. ते अक्रूराला दोष देऊं लागले. परंतु श्रीकृष्णानें परत यायचें वचन दिलें.

सकाळ होतांच श्रीकृष्ण–बलराम रथांत बसले. गोपींना दुःख आंवरेना. त्यांनीं त्याच्या रथाला गराडा घातला. परंतु श्रीकृष्णानें काळजी करूं नका म्हणून त्यांना सांगितलें. रथ सुरू झाला. श्रीकृष्णाचा रथ दिसेनासा होईपर्यंत त्या तिकडे वेड्यासारख्या पहातच राहिल्या. यशोदेसकट सर्वांना गोकुळ सुनें सुनें वाटूं लागलें.

तिकडे मथुरेजवळच्या उपवनाजवळ अक्रूरानें रथ उभा केला व तो यमुनेवर स्नानाला गेला. त्याला पाण्यांत श्रीकृष्ण दैत्यांचा

वध करीत आहे असें दिसलें. तो पाण्याबाहेर आला. श्रीकृष्णाचें दर्शन घेतल्यानें त्याला स्वतः धन्य झाल्यासारखें झालें.

शेवटीं त्या उपवनांत त्या दिवशीं मुक्काम करण्याचें श्रीकृष्ण-बलराम आणि इतरांनीं ठरविलें. अक्रूर, श्रीकृष्ण-बलराम वगैरे आल्याची बातमी द्यायला कंसाकडे गेला.

## १४ कंसादि दैत्यांचा वध व उग्रसेनाची राज्यावर स्थापना

श्रीकृष्ण व बलराम आल्याचें वृत्त कळतांच कंसाचें अंतःकरण दचकलें व त्याला सर्वत्र श्रीकृष्णच दिसूं लागला. त्याला काय करावें हें सुचेना

सकाळीं उजाडल्यावर श्रीकृष्णानें व इतरांनीं आपले नित्याचे विधि उरकले. श्रीकृष्णानें आपले केंस वीराप्रमाणें बांधले. गळ्यांत मोत्यांचे हार घातले. मुकुटांत असंख्य दिव्य रत्नें खोंचलीं. मनगटावर वीरकंकणें चढविलीं व दोन्हीं हातांच्या बोटांत सुंदर अंगठ्या घातल्या. श्रीकृष्ण व बलराम रथांत चढले. गौळी त्यांच्या रथामागून जाऊं लागले. याचवेळीं एक परीट त्यांना वाटेंत भेटला. त्याचा रुबाब पाहून श्रीकृष्णानें त्याच्याजवळचीं वस्त्रें मागितलीं. तें ऐकून तो परीट म्हणाला, 'अरे चल गोरसचोरा, तुझा धांगडधिंगा त्या गोकुळांतच ठेव. इथें त्याचें कांहीं चालायचें नाहीं. एका थपडेबरोबर प्राणाला मुकशील.'

हें ऐकतांच श्रीकृष्णानें त्याचा शिरच्छेद केला व सर्व वस्त्रें गौळ्यांना वांटलीं. वाटेंत तंतुकाय नांवाचा कंसाचा शिंपी भेटला. त्यानें श्रीकृष्णाला नमस्कार करून आपल्याजवळचीं सर्व वस्त्रें त्याला अर्पण केलीं. त्याच मार्गानें जाणारी कंसाची दासी कुब्जा म्हणजेच गतजन्मींची मंथरा श्रीकृष्णाला भेटली. श्रीकृष्णानें तिचें वेडेंवांकडें शरीर पूर्ववत् करून देऊन तिला दिव्य शरीर प्राप्त करून दिलें. 'मी कंसाचा वध करून तुझ्याकडे येईन.' असें श्रीकृष्णानें तिला सांगितलें.

श्रीकृष्ण मथुरेंत आला हें कळतांच मथुरेंतील गोपी हातांतलीं कामें टाकून त्याला पहाण्यासाठीं धांवल्या. त्याला पहाण्यासाठीं



रस्त्याच्या दुतर्फा गर्दी झाली खिडकींतून, गच्चींतून, सज्जांतून, जिथून म्हणून श्रीकृष्णाचें दर्शन घडेल तेथें गोपी व लोक जमूं लागले. त्याच्यावर त्यांनीं फुलें उधळलीं व रत्नदीप ओवाळले. त्या सुकुमार श्रीकृष्णरूपाला पाहून त्या अत्यंत चकित झाल्या.

श्रीकृष्ण धनुर्यागाच्या मांडवाजवळ आला. यज्ञमंडपाच्या दारांत एक अतिप्रचंड लोखंडाचें धनुष्य ठेवलें होतें. तें श्रीकृष्णानें उचललें व काड्दिशी मोडून फेंकलें. हा प्रकार पहातांच तेथ पहारा करीत असलेले हजार दैत्य त्या दोघांवर धांवून गेले. परंतु श्रीकृष्ण–बलरामांनी त्या धनुष्याच्या कांबीनें त्यांना झोडपून ठार केलें व ते उपवनांत परतले. हें वृत्त कळतांच कंस जास्त चिंतामग्न झाला.

पुढें श्रीकृष्णानें त्याच्या वधासाठीं पाठविलेल्या हत्तीचा वध केला. दारावरील द्वारपालांचा हत्तीच्या सुळ्यांनीं वध केला व ते रंगमंडपांत गेले. तेथें श्रीकृष्णानें व बलरामानें मुष्टिक व चाणूर या दैत्यांचा वध केला. हें पहातांच कंस म्हणाला, ''अरे, याला येथून हांकलून द्या व उग्रसेनाला ठार करा.'' हें ऐकतांच श्रीकृष्णानें कंसाला सिंहासनावरून खालीं खेंचून त्याचा वध केला.

पुढें श्रीकृष्णानें उग्रसेनाची सुटका करून त्याला राज्यावर बसवलें. वसुदेव–देवकीची सुटका करून त्यांना वस्त्रें, अलंकार दिले. देवकीला व वसुदेवाला अत्यानंद झाला. पुढें श्रीकृष्णानें नंदास गोकुळांत जातांना निरोप दिला व म्हणाला, 'आपण माझें अत्यंत ममतेनें पालन केलें तें मी कधींहि विसरणार नाहीं. आतां माझें स्मरण ठेवा व गोकुळांत सुखानें रहा.'

परंतु नंद म्हणाला, 'मी तुला सोडून गेलों तर गोप–गोपी माझ्यावर रागवतील व माझी निंदा करतील. तरी तूं येणार नसशील तर मीच जाणार नाहीं.'

हें ऐकून श्रीकृष्ण म्हणाला, 'मी तुम्हांला विसरणें शक्य नाहीं. तुमचा माझा वियोग कधींच होणार नाहीं.' शेवटीं नाइलाजानें नंद व गौळी गोकुळाला परतले तत्पूर्वीं गर्गमुनींनीं श्रीकृष्ण–बल-राम यांचें मौंजीबंधन करून घेतलें. पुढें श्रीकृष्णानें उग्रसेन, कुब्जा व इतर मथुरेंतील लोकांच्या घरीं जाऊन भेटी दिल्या.

## १५ श्रीकृष्णाचें अध्ययन व गुरुदक्षिणा

पुढें श्रीकृष्णानें सांदिपनींच्या आश्रमांत विद्या, शास्त्र वगैरेंचें शिक्षण घेतलें. शिक्षण संपतांच त्यानें सांदिपनींना साष्टांग नम-स्कार घातला व विचारलें, 'महाराज, मी आपल्याला गुरुदक्षिणा काय देऊं ?'

सांदिपनी म्हणाले, 'हे श्रीकृष्णा, फक्त आम्हांला आमचा मृत पुत्र दे.'

हें ऐकतांच श्रीकृष्णानें त्यांना हातीं धरून सागरतीरीं नेलें. श्रीकृष्णानें सागराला त्यांच्या पुत्राबद्दल विचारलें. पांचजन्य नांवाच्या राक्षसानें त्या पुत्राचें भक्षण केलें असल्याचें कळतांच श्रीकृष्णानें सागरांत प्रवेश केला. त्यानें पांचजन्याचा शोध केला व त्याचा वध केला. त्याचें पोट फाडून पाहिलें, परंतु गुरुपुत्र आढ-ळला नाहीं. तेव्हां तो यमाकडे गेला. यमानें त्याची पूजा करून, येण्याचें प्रयोजन विचारलें. त्यानें त्याला सांदिपनींच्या पुत्रास आणून देण्यास आज्ञा केली. यमानें सांदिपनींच्या पुत्राचा लिंगदेह

आणून श्रीकृष्णाला दिला.

त्यानें दिव्य देह निर्माण करून त्यांत लिंगदेह ठेवला व मग गुरुपुत्राला हातीं धरून तो आश्रमांत गेला व त्यानें गुरूंना पुत्र दिला. त्या माता–पित्यांना अत्यानंद झाला. पुढें गुरूंची आज्ञा घेऊन श्रीकृष्ण व बलराम मथुरेस परतले.

## १६. जरासंधाचा पराभव, कालयवनाचा वध व बलरामाचा विवाह

कंसाचा वध झाला परंतु त्याच्या राण्या अस्ति व प्राप्ति या दुखावल्या. त्या आपल्या पित्याकडे म्हणजेच मगध देशाचा राजा जरासंध याच्याकडे गेल्या. त्यांनीं घडलेलें सर्व वृत्त त्याला सांगितलें. तो संतापला व स्वतःच्या जांवयाच्या वधाचा सूड घ्यायचा त्यानें ठरविला. त्यानें असंख्य सैन्य घोडदळ, पायदळ, हत्ती वगैरे घेऊन मथुरेला वेढा दिला.

मथुरेंतील सर्व प्रजाजन घाबरले. सात्यिक, अक्रूर, उग्रसेन वगैरेंनीं श्रीकृष्णाला संकटाची कल्पना दिली. श्रीकृष्ण व बलराम यांनीं जरासंधाच्या सैन्याची पहाणी केली. परिस्थितीची कल्पना येतांच श्रीकृष्णानें आपली दृष्टि आकाशाकडे फेंकली तोंच दोन दैदिप्यमान रथ खालीं उतरले. त्यांपैकीं एका रथांत शाङ्गधनुष्य, शंख, चक्र, गदा व इतर आयुधें होतीं व त्या रथाचा सारथी होता दारुक. त्या रथांत असंख्य अक्षय भाते होते. त्या रथाला शैब्य, सुग्रीव, बलाहक व मेघपुष्प नांवाचे चार उत्तम घोडे जोडले होते. त्या रथाचें तेज सहस्र सूर्यांच्या तेजाप्रमाणें होतें.

दुसऱ्या रथांत नांगर व मुसळ हीं आयुधें होतीं. रथ जमिनीवर उतरतांच दारुकानें श्रीकृष्णाला साष्टांग नमस्कार घातला. श्रीकृष्णानें चतुर्भुज रूप धारण करून रथांत चढून चारहि आयुधें आपल्या हातांत घेतलीं. दुसऱ्या रथांत बलराम चढला व त्यानें आपल्या हातांत नांगर व मुसळ घेतलें. हें पहातांच राजा उग्रसेनहि सैन्य घेऊन जरासंधाच्या सैन्यावर तुटून पडला. बलराम व श्रीकृष्ण यांनीं आपले शंख वाजवले.

शिशुपाल, वक्रदंत, रुक्मि हेहि युद्धांत सामील झाले होते. ते जरासंधाच्या बाजूनें लढत होते. असें युद्ध चालू झालें. बलरामानें जरासंधाचा पराभव करून सतरा वेळां स्वतःच्या रथास बांधून आणलें व श्रीकृष्णाच्या आज्ञेनें सोडून दिलें.

यावेळीं नारदमुनि जरासंधाकडे प्रगटले व म्हणाले, 'अरे, तुझा सतरा वेळां पराभव झाला आहे. यादवांचे गुरु गर्गाचार्य यांना म्लेंच्छ स्त्रीपासून झालेला पुत्र कालयवन आहे. तो यादवांचा संहार करील. तरी त्याला पाचारण कर.'

पुन्हां जरासंधानें सैन्य जमवून कालयवनासह लढाई सुरू केली. श्रीकृष्णाला हें कळतांच त्यानें पाण्यांत रातोरात द्वारका नगरी वसवली. त्या नगरींतले लोक आश्चर्यचकित झाले.

तिकडे मथुरेंत फक्त श्रीकृष्णच राहिला जरासंध व कालयवन यांनीं पाहिलें तों सर्व मथुरानगरी शांत दिसली. फक्त मथुरेचें महाद्वार उघडें ठेवून श्रीकृष्ण उभा असलेला त्यांना दिसला. हें पहातांच कालयवन श्रीकृष्णाला धरायला धांवला. श्रीकृष्ण पुढें व कालयवन मागें अशी शर्यत चालू झाली. असंख्य पर्वत ओलांडून ते गेले. शेवटीं एका दरींत श्रीकृष्ण शिरला.

त्या दरीच्या विवरांत मांधाता याचा पुत्र मुचुकुंद हा झोंपला होता. बरेच दिवस देवांचें दानवांपासून रक्षण करून तो थकला होता व विश्रांति घेत तेथें झोंपला होता. श्रीकृष्णानें मुचुकुंदाजवळ जाऊन स्वतःचें पीतांबर त्याच्यावर पांघरलें व तो बाजूला लपून बसला. श्रीकृष्णाचा शोध करीत कालयवन तेथें आला. त्याला आनंद झाला व त्यानें त्या झोंपलेल्या आकृतीला श्रीकृष्ण समजून जोरानें लाथ मारली. मुचुकुंदानें रागानें डोळे उघडून पाहिलें तोंच त्या कालयवनाचें तेथेंच भस्म झालें. त्यानें पाहिलें तों स्वतःच्या अंगावर पीतांबर वस्त्र होतें. त्यानें पाहिलें तों चतुर्भुज कृष्ण उभा होता. तो त्याच्या दर्शनानें धन्य पावला.

श्रीकृष्णाच्या आज्ञेनुसार पुढें मुचुकुंद बद्रिकाश्रमांत जाऊन राहिला. पुढें श्रीकृष्ण विवरांतून बाहेर येतांच त्याला बलराम दिसला. त्याच्या मागें जरासंध व कालयवन यांचें सैन्य पाठलाग



करीत तेथें आलें. श्रीकृष्ण व बलरामांना पहातांच त्यांनीं त्या पर्वताला वेढा घातला व चहूंकडून आग लावली. त्या आगींत असंख्य पक्षी व श्वापदें मृत्युमुखीं पडलीं.

श्रीकृष्णानें आज्ञा करतांच वैकुंठाहून गरुड आला व ते दोघे त्याच्या पाठीवर बसून मथुरेस आले. तेवढ्यांत दारुक रथ घेऊन द्वारकेहून तेथें आला. परंतु जरासंध व कालयवन यांचें सैन्य येतांच श्रीकृष्णानें सुदर्शन चक्रानें त्या सैन्याचा संहार केला. जरासंध जरी चालून आला तरी त्याचा त्यानें पराभव केला. पुढें बलराम-श्रीकृष्ण द्वारकेस आले. पुढें आवर्त देशाचा राजा रेवन यानें आपली मुलगी रेवती हिचा विवाह बलरामाशीं करून दिला. कारण ब्रह्मदेवानें बलरामच योग्य असा वर असल्याचें त्याला सांगितलें होतें. स्वतः ब्रह्मदेवानें श्रीकृष्ण–बलराम यांना द्वारकेहून आवर्त देशांत नेलें व बलरामाचें रेवतीबरोबर लग्न लावून दिलें.

## १७. रुक्मिणी स्वयंवर

विदर्भ देशचा राजा भीमक याला रुक्मि, रुक्मरथ, रुक्मबाहु रुक्मकेशी आणि रुक्ममाली असे पांच मुलगे होते. तसेंच त्याला रुक्मिणी नांवाची कन्याहि होती. ती दिसायला अत्यंत सुंदर होती. राजा भीमक स्वतः मोठा सुशील व सात्विक होता. तो एकदां

रुक्मिणीला मांडीवर घेऊन राजसभेंत बसला होता. त्यावेळीं कीर्तिमुख नांवाचा सर्व कलानिपुण असा ब्राह्मण तेथें आला. राजानें त्याचें स्वागत करून त्याला उत्तम अशा आसनावर बसवलें. तो आसनावर बसतांच राजानें त्याला विचारलें, ' महाराज, आपण अकस्मात असे कुठून बरें आलांत ?'

हें ऐकून कीर्तिमुख म्हणाला, ' हे महाराजा, मी पृथ्वीपर्यटन करीत राजे लोकांना पहात आलों आहें. परंतु द्वारकेच्या श्रीकृष्णासारखा राजा मीं अद्यापि पाहिलाच नाहीं. त्याचें रूप आगळेंच आहे. त्याचें शब्दांत वर्णन करणें कठीण. असलें लावण्य मीं अद्यापि तरी पाहिलेलें नाहीं. तें कांहीं वेगळेंच आहे. त्या शंख, चक्र, गदा, पद्म धारण केलेल्या चतुर्भुज रूपाचें वर्णन काय मी करूं ?

' असा राजा या त्रिभुवनांत सांपडणार नाहीं. त्याची कांति नील नभाप्रमाणें असून त्यावर लावलेली चंदनाची शुभ्र उटी ही तर अत्यंत विलोभनीय दिसते. त्याच्या अंगाला सुवास येत असून त्या सुवासानें चारी दिशा दरवळून गेल्या आहेत. '

हें सर्व वर्णन ऐकतांच रुक्मिणीचें देहभान नाहींसें झालें व ती मूर्च्छा येऊन पडली. तिच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले व सर्वांगाला कांपरें भरलें. ही सर्व तिची अवस्था पाहून भीमकानें मनांत निश्चय केला कीं, ती श्रीकृष्णालाच अर्पण करायची. त्यानें आपलें मनोगत राणी शुद्धमति हिला सांगितलें. तें ऐकून तिलाहि आनंद झाला.

परंतु ही गोष्ट रुक्मिणीचा भाऊ रुक्मि याला आवडली नाहीं. त्याच्या मनांत तिचें लग्न शिशुपालाशीं व्हावें असें होतें. त्यानें भरसभेंत श्रीकृष्णाची नालस्ती केली व लागलीच लग्नाची तयारी करण्याची आज्ञा दिलीसुद्धां.

भीमकाला हें ऐकून धक्का बसला परंतु त्याचें रुक्मीपुढें कांहीं चालत नसल्यानें तो गप्प राहिला.

रुक्मिणीला हें वृत्त कळतांच तेथें आलेल्या तिच्या महालांतील सुदेव ब्राह्मणाकडे तिनें श्रीकृष्णाला लिहिलेलें पत्र दिलें. त्याला तें श्रीकृष्णाकडे पोहोंचतें करण्यास सांगितलें. तो ब्राह्मण पहांटेस



द्वारकेला पोंचला. श्रीकृष्णानें त्याचें स्वागत केलें. ब्राह्मणानें तें पत्र त्याच्या हातीं दिलें. तें पत्र वाचून श्रीकृष्णानें काळजी करूं नको असें रुक्मिणीला सांगितलें. ब्राह्मण परत गेला व त्यानें तसा निरोप रुक्मिणीला दिला.

पुढें श्रीकृष्णानें स्वतःच्या आगमनाची वार्ता भीमकाला सुदेवाकडून दिली. भीमकाला आनंद झाला, त्यानें श्रीकृष्ण व बलरामांचें स्वागत केलें. परंतु रुक्मि व जरासंधाला तें वृत्त ऐकून राग आला. कांहींतरी घडणार हें त्यांनीं जाणलें. श्रीकृष्ण व बलराम देवीच्या देवळाजवळ उतरले. कारण त्यांना पुढील कार्य उरकायचें होतें.

कुलाचाराप्रमाणें रुक्मिणीला देवीचें दर्शन घ्यायचें होतें. तिच्याबरोबर जरासंध, रुक्मि, शिशुपाल वगैरे व त्यांचें सैन्यहि होतें. रुक्मिणीनें देवीची पूजा केली. तिनें श्रीकृष्ण पति मिळावा अशी देवीला प्रार्थना केली. देवी प्रसन्न झाली व तिनें एक निळ्या कमळांची माळ रुक्मिणीच्या हातीं दिली व म्हणाली, ' ही नीलकमळांची माळ श्रीकृष्णाच्या गळ्यांत घालून त्याला वर. ' हें ऐकून रुक्मिणीनें अंबिका देवीच्या चरणांवर मस्तक ठेवलें. नंतर

ती उठली व प्रदक्षिणा घालूं लागली.

तिचें रूप पहातांच सर्व सैन्य, अधिकारी वगैरे एवढे मोहित झाले कीं, त्यांना स्वतःच्या हातांतील शस्त्रांचेंहि भान राहिलें नाहीं. श्रीकृष्णानें संधि साधून रुक्मिणीला रथांत घेतली व त्यानें दारुकाला रथ सुरू करण्यास आज्ञा दिली. रुक्मिणीनें श्रीकृष्णाच्या गळ्यांत माळ घातली व त्याच्या चरणांवर आपलें मस्तक ठेवलें. त्यानें तिच्या मस्तकावर आपला हात ठेवला. तिला अत्यानंद झाला. श्रीकृष्ण यादव सैन्यासह द्वारकेकडे निघाला.

## १८. रुक्मि व शिशुपाल यांचा पराभव व श्रीकृष्णाचा लग्नसमारंभ

थोड्याच वेळांत जरासंध, शिशुपाल वगैरे सारे सावध झाले व पाहूं लागले तों त्यांना रुक्मिणी कुठें आढळेना. एवढे मोठे वीर हातांत शस्त्रें घेऊन हजर असतांना रुक्मिणी नाहींशी होते याचा अर्थ काय ? सर्वजण घाबरूं लागले. एवढ्यांत श्रीकृष्ण रुक्मिणीला घेऊन पळाला अशी बातमी सर्वत्र पसरली. ही बातमी पसरतांच सर्व सैन्य यादव सैन्यामागें धांवलें.

श्रीकृष्ण-बलरामांना हें कळतांच त्यांनीं आपले रथ थांबवले व त्या सैन्याशीं लढाई सुरू केली. बलरामानें हातांत नांगर व मुसळ घेऊन सर्वांचा संहार करायला सुरवात केली. रुक्मीला ही वार्ता कळतांच तो श्रीकृष्णाला पकडण्यासाठीं स्वतः रणक्षेत्रांत उतरला. परंतु श्रीकृष्णानें त्याला थोड्याशा लढाईनंतर त्याच्या गळ्यांत धनुष्य घालून खालीं ओढला व त्याचे केंस हातांत धरून त्याचे शिर छेदण्यासाठीं हातांत धरलें. परंतु रुक्मिणीनें श्रीकृष्णाचे पाय धरले व त्याला सोडून देण्याची विनंति केली श्रीकृष्णानें त्याला रथाला बांधलें व त्याच्या मस्तकाचे पांच पाट काढून अर्धी दाढी व मिशी बोडून तोंडाला काजळ फांसून त्याला सोडून दिलें.

परंतु बलरामानें तें पहातांच श्रीकृष्णाला तसें करणें योग्य नव्हे असें सांगून रुक्मीचें समाधान करून त्याला वस्त्रेंभूषणें देऊन

माघारीं पाठवला. रुक्मीला या घटनांचें दुःख झालें व तो भोजकटक नांवाचें नगर रचून राहिला.

पुढें द्वारकेस परत जातांना सोरटी सोमनाथाजवळ मूळमाधव नांवाच्या गांवाजवळ श्रीकृष्णानें मुक्काम केला. भीमक राजाला श्रीकृष्ण जांवई लाभणार याचा आनंद झाला. तो तेथें दाखल झाला. शेवटीं बलरामाच्या सांगण्यावरून कौंडिण्यपूर येथें विवाह न करतां श्रीकृष्णाचा विवाह मूळमाधव गांवीच करावा असें सुचवलें. भीमकानें तें मान्य करून पत्रें धाडून सर्वांना तेथें बोलावलें.

राणी शुद्धमतीसह सर्वजण तेथें आले. ठरल्याप्रमाणें श्रीकृष्ण सर्व यादवांसह वाजतगाजत लग्नमंडपांत आला. भीमकानें सर्वांचें स्वागत केलें. नंतर रुक्मिणीला वस्त्रालंकार वसुदेवानें अर्पण केलें.

अशा रीतीनें लग्नसोहळा पार पडल्यावर श्रीकृष्णानें रुक्मिणीसह द्वारकेंत प्रवेश केला. द्वारकेंत श्रीकृष्णानें प्रवेश करतांच लोकांनीं त्यांचें थाटानें स्वागत केलें व घरोघर मोठा उत्सव केला.

## १९. स्यमंतक आणि श्रीकृष्णाचा सत्यभामेशीं विवाह

सत्राजित नांवाच्या राजानें सूर्याची उपासना करून स्यमंतक मणि प्राप्त करून घेतला होता. नारदांनीं ही गोष्ट श्रीकृष्णाला सांगितली. परंतु सत्राजिताला भरसभेंत नारद तो मणि श्रीकृष्णाला दे म्हणाले तें आवडलें नाहीं. व तो सभा सोडून निघून गेला. एक दिवस सत्राजिताचा भाऊ प्रसेन यानें तो मणि गळ्यांत बांधला व तो शिकारीस गेला. त्या मण्याची कांति पाहून एका सिंहानें त्याच्यावर हल्ला करून तो मणि पळवला. पुढें सिंह वाटेनें जात असतां जांबुवंताच्या दृष्टीस पडला. जांबुवंतानें त्याला एक चपराक देऊन ठार केलें व मणि हस्तगत केला. त्यानें तो मणि आपली लाडकी कन्या जांबुवंती हिच्या पाळण्यावर बांधला.

इकडे लोकांनीं असें उठवलें कीं, श्रीकृष्णानें स्यमंतक मण्यासाठीं प्रसेनाला ठार मारलें. परंतु श्रीकृष्णाला हें कळतांच त्यानें सत्राजिताला त्याचा मणि परत आणून देण्याचें आश्वासन दिलें.



पुढें श्रीकृष्णानें शोध करतां करतां जांबुवंताच्या नगरींत प्रवेश केला. त्यावेळीं जांबुवंत झोंपला होता. श्रीकृष्णाला पहातांच जांबुवंताच्या बायका मोहित झाल्या. श्रीकृष्णानें त्यांना तो मणि मागितला. परंतु जांबुवंत जागा झाला तर त्याचा निभाव लागणार नाहीं असें त्यांनीं त्याला सांगितलें. मांडी ठोकून श्रीकृष्ण उभा राहिला.

त्या आवाजानें जांबुवंत उठला व म्हणाला, 'कोण आहेस रे तूं ?'

'मी कोण हें नंतर सांगतों. अगोदर तूं जो स्यमंतक मणि चोरून आणला आहेस तो दे.' श्रीकृष्ण म्हणाला.

'वारे वाऽ! अगोदर वडबड थांबव!' जांबुवंत म्हणाला.

'असेल हिंमत तर चल ये पाहूं.' श्रीकृष्ण म्हणाला.

पुढे जांबुवंत व श्रीकृष्ण यांचें २८ दिवस युद्ध झालें. शेवटीं जांबुवंत पराभूत होऊन जमिनीवर पडला. त्यानें श्रीरामाचें स्मरण केलें. श्रीकृष्णानें त्याला तसें दर्शन घडवलें व घडलेली हकीकत सांगितली. जांबुवंतानेंसुद्धां स्यमंतकाची घडलेली हकीकत सांगितली. पुढें त्याच्या विनंतीनुसार श्रीकृष्णानें जांबुवंतीशीं लग्न केलें.

तेथें नारदांना गायनाचा गर्व झाला होता. तो श्रीकृष्णानें एका

अस्वलाला बोलावून, गायला लावून त्यांचा गर्व उतरवला.

पुढें श्रीकृष्ण द्वारकेस आला व त्यानें सत्राजिताला बोलावून तो मणि त्याच्या हातीं दिला. सत्राजितानें स्वतःची कन्या सत्यभामा हिचा श्रीकृष्णाशीं विवाह लावून दिला.

पुढें शतधन्वा नांवाच्या यादवाला सत्यभामा द्यायचें ठरलें होतें. तो रागावला व त्यानें सत्राजिताला ठार करून तो मणि हस्तगत केला. हें वृत्त कळतांच श्रीकृष्णानें शतधन्वाचा पाठलाग करून सुदर्शन चक्रानें त्याचा शिरच्छेद करून मणि आहे कां पाहिलें. परंतु तो अक्रूराजवळ असल्याचें त्याला कळलें. अक्रूर घाबरून बारा वर्षें वनांत निघून गेला होता. श्रीकृष्णानें त्याचा शोध करून त्याला द्वारकेंत आणलें. शेवटीं श्रीकृष्णानें तो मणि सत्यभामेस दिला.

## २०. नरकासुराचा वध व सोळा हजार एकशें आठ स्त्रियांशीं श्रीकृष्णाचें लग्न

पुढें श्रीकृष्णानें कालिंदी, मित्रविंदा, याज्ञाविनी, भद्रावती, लक्ष्मणा वगैरे राजकन्यांशीं पराक्रम करून लग्न केलें व त्यांचा स्वीकार केला. एकदां नारदांनीं पारिजातकाचें फूल श्रीकृष्णाला दिलें. हें कळतांच सत्यभामा रागावली. श्रीकृष्णानें पुढें तिच्या दारांतच पारिजातकाचें झाड आणून लावलें. एकदां इंद्रानें श्रीकृष्णाकडे जाऊन त्याला नमस्कार केला व म्हणाला, 'नरकासुर स्वर्गांत येऊन मुकुट घेऊन गेला. आमची माता अदिति हिचीं दिव्य कुंडलेंहि त्यानें नेलीं आहेत. तो अत्यंत माजला आहे. तरी कृपा करून त्याचा संहार करावा !'

श्रीकृष्णानें तयारी केली व नरकासुराच्या राजधानीवर हल्ला केला. त्यानें नरकासुराचें शिर तो ऐकत नाहीं असें पाहून सुदर्शन-चक्रानें छेदलें. त्यानें प्राग्ज्योतिषपूर नगरांत प्रवेश केला. तेथील सोळा हजार शंभर राजकन्यांनीं श्रीकृष्णाशीं विवाह करण्याची इच्छा प्रगट केली. श्रीकृष्णानें त्यांना द्वारकेस नेलें. अगोदर श्रीकृष्णानें नरकासुराचा पुत्र भगदत्त याची राज्यावर स्थापना

केली. नंतर तो गरुडावर बसून इंद्राकडे गेला व त्याचा मुकुट व कुंडलें परत केलीं. त्यानें पुढें त्या सर्व कन्यांशीं लग्न केलें.

## २१ प्रद्युम्नाचा जन्म व शंबराचा वध--अनिरुद्धाचा जन्म

श्रीकृष्णाच्या स्त्रियांचें त्याच्यावर अत्यंत प्रेम होतें. पुढें रुक्मिणी व सत्यभामेनें अशी पैज मारली कीं, जिला प्रथम अपत्य होईल तिला दुसरीनें स्वतःची वेणी द्यायची. पुढें रुक्मिणीच्या इच्छेनुसार श्रीकृष्णानें पुत्रप्राप्तीसाठीं एक वर्ष तपश्चर्या केली. शंकर प्रसन्न झाले व त्यांनीं श्रीकृष्णाला काय पाहिजे असें विचारलें, त्यावर श्रीकृष्ण म्हणाला, 'मला मदनासारखा पुत्र व्हावा हीच माझी विनंति आहे.' शंकर म्हणाले, 'तथास्तु.'

पुढें श्रीकृष्ण द्वारकेस आला. रुक्मिणीला पुढें पुत्रप्राप्ति झाली. पुढें पांचव्या दिवशीं श्रीकृष्ण सर्व यादवांसह देवीच्या नवसासाठीं वनांत गेला. त्यावेळीं नारद सत्यभामेच्या महालांत प्रगटले तेव्हां तिनें रुक्मिणीवरोबर मारलेली पैज त्यांना सांगितली व त्यांतून मार्ग काय काढायचा असें विचारलें. नारद म्हणाले, 'मी हें वृत्त मदनाचा शत्रु शंबर याला सांगतों, तूं कांहीं काळजी करूं नकोस.'

पुढें नारद शंबरासुराकडे गेले व त्यांनीं त्याला सांगितलें, 'हे शंबरा, तुझा शत्रु द्वारकेंत श्रीकृष्णाच्या पोटीं जन्मला आहे. तो सध्यां रुक्मिणीच्या महालांत आहे!' शंबरानें लागलीच रुक्मिणीच्या मंदिरांत प्रवेश करून बाळाला पळवलें. त्यानें त्याला पायाला धरून गरगरां फिरवून समुद्रांत फेंकून दिलें, परंतु तें बालक एका माशानें गिळलें. पुत्र नाहींसा झाला हें कळतांच रुक्मिणी रडून दुःख करूं लागली.

परंतु श्रीकृष्णानें तिला तिचा पुत्र पुन्हां १२ वर्षांनीं भेटेल असें सांगितलें. पुढें तो मासा एका कोळ्याच्या हातीं लागला. त्या माशाचें तेज पाहून कोळ्यानें तो मासा शंबरासुराला अर्पण केला. त्यानें तो रतीकडे पाठवून दिला. रतीनें तो चिरतांच सुंदर बालक तिच्या दृष्टीस पडलें. तिनें आनंदानें त्याला उचललें, परंतु त्याचें संरक्षण कसें करायचें याचा ती विचार करूं लागली. परंतु तेथें नारद

प्रगटले व म्हणाले, ' रति, हा तुझा पति मदनच आहे, हा श्रीकृष्णाचा पुत्र आहे. तुला मी एक मंत्र सांगतों कीं, ज्यामुळें हा फक्त तुलाच दिसेल. तसेंच याला कामधेनु नित्य दूध पाजील.' नारद एवढें सांगून निघून गेले. तो बारा वर्षांचा होतांच नारदांनीं त्याचें रतीशीं गांधर्वविधीनें लग्न लावून दिलें. पुढें ती गर्भवती झाली. शंबराला हें कळतांच तो संतापला व मदनावर चाल करून गेला. परंतु मदनानें आपल्या एका दिव्य बाणानें त्याचा शिरच्छेद केला. तो रथांत बसला व द्वारकेंत जाऊन त्यानें सर्व वृत्तांत सांगितला. पुढें प्रद्युम्नानें श्रीकृष्ण, बलराम वगैरेंना नमस्कार केला. स्त्रियांना वाटलें, श्रीकृष्णानेंच पुन्हां लग्न करून दुसरी स्त्री आणली. कारण प्रद्युम्न श्रीकृष्णासारखाच दिसत होता.

पुढें रतीला नऊ महिने पूर्ण झाल्यावर पुत्ररत्न प्राप्त झालें. श्रीकृष्णानें त्याचें नांव अनिरुद्ध असें ठेवलें. श्रीकृष्ण प्रद्युम्न व अनिरुद्ध एकसारखे दिसत होते. पुढें श्रीकृष्णाच्या इतर स्त्रियांनाहि पुत्ररत्नें झालीं. त्यांना एकूण एक लक्ष साठ हजार पुत्र झाले.

## २२. उषा-अनिरुद्ध विवाह व बाणासुराचा वध

शोणितपुरांत बाणासुर नांवाचा दैत्य राज्य करीत होता. त्याला शंकराच्या कृपेनें सहस्र हात प्राप्त झाले होते. त्याला उषा नांवाची लावण्यवति कन्या होती. एकदां कैलासावर शिव-पार्वती सारिपाट खेळत असतां उषा तेथें गेली आणि तिला वाटलें, असेंच आपल्याला स्वतःच्या पतीबरोबर सारिपाट खेळायला मिळावा. पार्वतीनें तिची इच्छा ओळखून तिला तसा आशीर्वाद दिला.

पुढें उषेला एकदां स्वप्नांत एक राजकुमार दिसला. त्या दिवशीं वैशाख शुद्ध द्वादशी होती. पार्वतीच्या वरानें तो राजकुमार तिला त्या दिवशीं दिसला. तिनें जाग येतांच पाहिलें तों ती एकटीच होती. शेवटीं चित्ररेखानें चित्रें काढून दाखवलीं व अनिरुद्धासारखें हुबेहूब चित्र काढतांच उषेनें हाच स्वप्नांत आला होता असें सांगितलें. चित्ररेखा अनिरुद्धाला आणायला द्वारकेजवळ आली. परंतु द्वारकेभोंवतीं श्रीकृष्णाचें सुदर्शन फिरत होतें. एव-

ढ्यांत नारदांनीं तिला स्वतःचें नामस्मरण करण्यास सांगितलें. तिनें तसें केलें. ती अनिरुद्धाच्या महालांत गेली व त्याला मंचकासह घेऊन शोणितपुराला आली.

पुढें उषा गरोदर राहिल्याचें बाणासुराला कळलें. तो अनिरुद्धावर धांवला. पुढें श्रीकृष्णाला हें कळतांच बाणासुर, शंकर, श्रीकृष्ण, बलराम यांचें युद्ध झालें. शेवटीं बाणासुराला शंकरांनीं श्रीकृष्णाच्या पायांवर लोटलें. बाणासुराला सर्व वृत्त कळतांच तोहि आनंदित झाला. पुढें अनिरुद्ध व उषेचा विवाह झाला. नारदांनीं आपलें काम फत्ते झालें हें पाहून समाधानाचा निःश्वास सोडला.

## २३. कृष्ण–सुदामा भेट

एकदां श्रीकृष्णाचा बालमित्र सुदामा श्रीकृष्णाला भेटायला गेला. श्रीकृष्णानें त्याचें स्वागत केलें व कुशल विचारलें. पुढें सुदाम्यानें दिलेले पोहे श्रीकृष्णानें गोड मानून सेवन केले. तो परतायला निघाला तेव्हां दूरवर तो त्याला पोंचवायलासुद्धां गेला. जाण्यापूर्वीं श्रीकृष्णानें त्याला अंगावरचीं वस्त्र, अलंकार काढून ठेवून जाण्यास सांगितलें. हें पाहून सुदाम्याला वाईट वाटलें. तो मनाशीं म्हणाला, ‘ माझें नशीबच दरिद्री आहे. त्याला कोण काय करणार ! ’ त्यानें मोठ्या दुःखानें श्रीकृष्णाचा निरोप घेतला.

सुदामा आपल्या गांवाजवळच्या वेशीजवळ येऊन पहातो तों त्याला वाटलें, आपण पुन्हां द्वारकेकडेच आलों आहों. तो वेड्यासारखा इकडेतिकडे पाहूं लागला. याचवेळीं नगरीच्या दारांतून लोक बाहेर येतांना पाहून त्यानें त्यांना त्या नगरीचें नांव विचारलें.

ते म्हणाले, ‘ सुदामपुरी. ’ त्याला वाटलें, लोक त्याची चेष्टाच करीत आहेत. परंतु तेवढ्यांत प्रधान सुदाम्याला सामोरा गेला व त्यानें सुदाम्याला साष्टांग नमस्कार घातला. पुढें वाजत गाजत त्याला नगरींत नेण्यांत आलें. पुढें त्याच्या पतिव्रता पत्नीनें त्याला आरती ओवाळली. मग प्रधानांनीं सुमूहूर्त पाहून सुदाम्याला सिंहासनावर बसवून राज्याभिषेक केला. ही सर्व श्रीकृष्णाची कृपा हें जाणून सुदामा स्वतःला धन्य समजला.

# २४. सुवर्णतुला



एक दिवस नारद सत्यभामेच्या मंदिरांत आले असतां तिनें त्यांना विचारलें, ' मुनिवर, श्रीकृष्ण जन्मोजन्मीं माझे पति लाभावे यासाठीं मी काय करूं ?'

नारदांनीं विचार केला व म्हणाले, ' तूं श्रीकृष्णाचें कुणाला तरी दान कर. '

सत्यभामेनें ही गोष्ट श्रीकृष्णाला सांगितली. तो फक्त हंसला. परंतु श्रीकृष्णाचें दान कुणी घेईना. शेवटीं नारदांनीं तें स्वीकारलें व ते त्याला घेऊन गेले.

इकडे ही वार्ता इतर स्त्रियांना कळली. त्यांनीं सत्यभामेची हजेरी घेऊन श्रीकृष्णाचें दान द्यायचा तिला काय अधिकार होता असें विचारलें. सत्यभामेला कळून चुकलें कीं नारदांनीं तिला वनवलें. बलरामास हें वृत्त कळतांच तो नारदांजवळून श्रीकृष्णास सोडवून आणण्यास सैन्य घेऊन निघाला. शेवटीं नारदांनीं श्रीकृष्णाच्या वजनाएवढें सोनें द्याल तर मी परत करतों असें सांगि-

तलें. लगेच सुवर्णतुला उभी करण्यांत आली.

परंतु द्वारकेंतील सर्व सोनें संपलें तरी श्रीकृष्णाचें पारडें वर जाईना. आतां फक्त रुक्मिणी तेवढी राहिली होती. तिनें तुळशीची पूजा केली व एक पिकलेलें पान ताटांत झांकून आणलें. तिनें श्रीकृष्ण व नारद यांची पूजा केली व तें तुलसीपत्र सुवर्णावर ठेवलें. लागलीच श्रीकृष्णाचें पारडें आपोआप वर गेलें. नारदांनीं रुक्मीणीची भक्ति पाहून ज्याचें त्याचें सोनें परत नेण्यास सांगितलें. त्यांनीं पुढें श्रीकृष्ण व रुक्मिणीला नमस्कार करून व प्रदक्षिणा घालून देवलोकीं प्रयाण केलें.

## २५. गरुडादिकांचा गर्वहरण व मारुति–श्रीकृष्ण भेट

नारदांच्या सांगण्यावरून मारुति तीर्थक्षेत्रें पहाण्यास निघाला. तो द्वारकेजवळ आला व वनांतील फळें खात बसला. वनरक्षकांना तो दाद देईना. शेवटीं गरुड व श्रीकृष्णाचे पुत्र यांनीं मारुतीला पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या सर्वांचीं मारुतीनें फजिती उडवून दिली. बलरामाला नारदांनीं मारुतीचा पूर्व इतिहास ऐकविला. त्यामुळें त्याचाहि गर्व आपोआप खालीं आला. शेवटीं श्रीकृष्णानें स्वत: श्रीरामाचें रूप, बलरामानें लक्ष्मणाचें रूप व रुक्मिणीनें सीतेचें रूप धारण केलें. पुढें अक्रूर, उद्धव व गरुड यांनीं मारुतीला साष्टांग नमस्कार घालून सभेंत आणलें. प्रभू रामाचें रूप पहातांच मारुतीनें त्याला साष्टांग नमस्कार घातला. श्रीकृष्णानें त्याला उठवून आलिंगन दिलें. पुढें त्याला रामावताराची आठवण दिली व कृष्णावतारांत पुन्हां भेटणार आहे असें सांगितल्याची आठवणहि दिली. मारुति धन्य झाला.

श्रीकृष्णानें त्याला आपल्या पंक्तीला घेऊन भोजन केलें. नंतर त्याला निरोप देतांना म्हणाला, 'हे मारुतिराया, आतां पुढें मी जेव्हां अर्जुनाचा सारथी होईन तेव्हां तूं त्याच्या ध्वजावर येऊन बैस.' मारुतीनें रामाला पुन्हां साष्टांग नमस्कार घातला व त्याचा निरोप घेऊन तो पुढील तीर्थास, तीर्थाटनास निघून गेला.

## २६. नारद नारदी झाला.
## सांब व अर्जुन यांचे विवाह

एकदां नारदांना वाटलें, आपण गृहस्थाश्रमी व्हावें. त्यांनीं आपलें मनोगत श्रीकृष्णाला सांगितलें व त्याच्या अनेक बायकां-पैकीं एकीस दान करण्यास विनवलें. श्रीकृष्णानें स्वतः ज्या पत्नी-कडे नसेल तिला घेऊन जावें असें नारदाला सांगितलें. परंतु प्रत्येक ठिकाणीं श्रीकृष्ण होताच! नारद वरमले व भागीरथीच्या तीरीं गेले. तेथें त्यांनीं स्नान करतांना बुडी मारतांच त्यांचें स्त्रींत रूपां-तर झालें. इतक्यांत एक कामातुर पुरुष तेथें आला. त्यानें नारदां-बरोबर कामक्रीडा केली. पुढें नवमासानंतर प्रसूत होऊन त्यांना प्रभव, निभव वगैरे ६० मुलें झालीं. नारदांना हें पाहून स्वकृत्याचा पश्चात्ताप झाला. त्यांनीं श्रीकृष्णाचें स्मरण केलें व त्या संकटां-तून सोडवण्याची विनंति केली. श्रीकृष्णानें त्यांना पुन्हां नारदांचें रूप दिलें.

तिकडे हस्तिनापुरांत दुर्योधनानें आपल्या कन्येचें स्वयंवर मांडलें होतें. ही गोष्ट सांबाला कळतांच त्यानें तिला पळवून नेली. दुर्यो-धनानें त्याला पकडून आणून बंदिशाळेंत ठेवलें. पुढें बलरामानें मोठा पराक्रम करून सांबाची सुटका करून त्याचा विवाह लावून देऊन द्वारकेस परत आणलें.

पुढें श्रीकृष्णानें अर्जुनाचा विवाह स्वतःची भगिनी सुभद्रा हिच्याबरोबर लावून दिला. अर्जुनानें त्यावेळीं मुनिवेषांत असतां-नाच सुभद्रेला श्रीकृष्णाच्या सूचनेनुसार पळवून नेलें व पुढें विवाह झाला. बलरामाच्या मनांत तिला दुर्योधनास द्यायचें होतें. परंतु श्रीकृष्णानें त्याची समजूत घातली होती.

## २७ धर्मराजाचा राजसूय यज्ञ

धर्मराजानें राजसूय यज्ञ केला. त्यावेळीं भीम जेवणाऱ्यांना म्हणाला, ‘ जर पानांत अन्न राहिलें तर शेंडीला बांधीन. ’ यामुळें जेवणारे नीट जेवेनात. श्रीकृष्णाच्या लक्षांत ही गोष्ट येतांच त्यानें

त्याला गंधमादन ऋषींना आणायला सांगितलें. भीमाला वाटेंत मारुतीची शेपटी दिसली. ती त्याला उचलतां येईना. त्याचें गर्व-हरण झालें. तसेंच गंधमादन ऋषींकडून त्यांचा सुवर्णदेह व डुक-राचें तोंड व त्यांतून येणारी घाण याचें कारण समजतांच भीमानें परत आल्यावर सर्वांना नम्रतेनें शांतपणें यथेच्छ जेवा असें सांगि-तलें. त्याला स्वतःची चूक कळून आली.

इकडे यज्ञ चालू असतां तिकडे जान्हवीतीरावर एक ब्राह्म-णाचें जोडपें आपली गुंफा बांधून रहात होतें. त्यांतील ब्राह्मणास भरदिवसां कामेच्छा झाली. परंतु त्यांची नियमाप्रमाणें शिवपूजेची वेळ होती. परंतु ब्राह्मण पत्नीचें न ऐकतां आडमार्गानें जाऊं लाग-तांच एका सर्पदंशानें तो मृत्यु पावला. ती रडूं लागली. त्याचवेळीं तेथें आलेल्या नारदांनीं तिला यज्ञाच्या ठिकाणीं तें प्रेत नेऊन ठेव व त्या प्रेताला जिवंत केलें तरच यज्ञाची पूर्ति होईल असें सांग-ण्यास बजावलें. त्या स्त्रीनें तसें केलें व तें प्रेत यज्ञाच्या ठिकाणीं नेऊन ठेवलें. श्रीकृष्णानें तें ओळखलें व हातांत पाणी घेऊन तो म्हणाला, ' मी खरोखरच जर ब्रह्मचारी असेन तर त्या ब्राह्मणाचें प्रेत उठेल. ' असें म्हणून त्यानें पाणी शिंपडलें. त्याबरोबर ब्राह्मण उठून बसला.

## शिशुपालाचा शिरच्छेद, नागराजाचा उद्धार

पुढें श्रीकृष्णाला अग्रपूजेचा मान दिला म्हणून शिशुपाल श्रीकृष्णाची निंदा करूं लागला. शेवटीं त्याचे शंभर अपराध होतांच श्रीकृष्णानें सुदर्शनाला बोलावून त्याचा शिरच्छेद कर-वला. त्याचें शीर त्याच्या पायाजवळ येऊन पडलें.

पुढें कुरुक्षेत्रांत सूर्यग्रहण आलें असतां श्रीकृष्ण तेथें गेला. तेथें त्यानें सरडा होऊन पडलेल्या नृगराचा उद्धार केला. पुढें वाटेंत एका ब्राह्मणाचीं आठ मुलें मेल्याचीं व नवव्याची चिंता ऐकून अर्जुनानें त्या बाळाचें रक्षण करण्याची प्रतिज्ञा केली. परंतु पांचव्या दिवशीं बाळ मेलें. ठरल्याप्रमाणें अर्जुन अग्निकाष्ठें भक्षणासाठीं तयार झाला. श्रीकृष्णाला हें कळतांच त्यानें स्वतःचा रथ माग-



वला. रथांत बसून ते दोघे निघाले. सातासमुद्रापलीकडे आदि-नारायणापुढें त्याला उभें केलें. त्या तेजानें अर्जुनाचे डोळे दिपून त्याला कांहीं दिसेनासें झालें. बाजूला श्रीकृष्णहि नव्हता. त्याचा जीव कासावीस होऊं लागला व तो श्रीकृष्णाचा धांवा करूं लागला. श्रीकृष्णानें पुढें त्याला त्या नऊ बालकांचें दर्शन घडवलें व अर्जुनानें तीं बालकें मागून घेतलीं. तीं परत आल्यावर ब्राह्मणाला बोलावून घेऊन त्याला परत दिलीं. ब्राह्मण संतुष्ट झाला.

पुढें श्रीकृष्णाचा निरोप घेऊन अर्जुन इंद्रप्रस्थाला गेला.

—श्रीकृष्णार्पणमस्तु—

---


प्रकाशक :
वा. ग. मेहेंदळे
रम्यकथा प्रकाशन,
१९२ नारायण पेठ,
पुणें ३०

मुद्रक :
वा. ग मेहेंदळे
जयभारत मुद्रणालय,
५५१ बुधवार पेठ,
पुणें २.

पुनर्मुद्रणाचे ... ान.

प्रथमावृत्ति : १९७ ... ारी १९७५


IRBK-0116553